CMYK

दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित. ▶ RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ४ थे ▶ अंक : २६० वा ▶ रविवार दि. १६ जुलै २०२३ ▶ किंमत : २ रु. ▶ पृष्ठे : ६

## एकनाथराव खडसे बदनामीप्रकरणी मानहानीचा दावा

**जळगाव ।** राज्यातील चाळीसगावचे भाजप आमदार मंगेश चव्हाण यांनी बदनामीकारक वक्तव्य करून समाजात बदनामी केल्याने राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार एकनाथ खडसे यांनी जळगाव



जिल्हा न्यायालयात आ.मंगेश चव्हाण यांच्या विरोधात फौजदारी खटला दाखल केला आहे. आमदार मंगेश चव्हाण यांच्यासोबत आपले कोणतेही वितुष्ट नसताना त्यांनी आपली समाजात बदनामी केल्याचा युक्तीवाद एकनाथराव खडसे यांनी न्यायालयात केला. विषय ठरला आहे.

### न्यूज कॉलम

## पॉलिश करून देण्याच्या बहाण्याने बांगड्या लंपास

**शिरपूर ।** दागिने पॉलिश करून देण्याचा बहाणा करून दोन भामट्यांनी भरदुपारी सहा तोळ्यांच्या सोन्याच्या बांगड्या लांबवल्या. दगडी बिल्डिंग परिसरातील एका महिलेकडे दोन जण आले. त्यांनी महिलेचा विश्वास संपादन करण्यासाठी प्रारंभी घरातील पूजेच्या भांड्यांची पॉलिश करून दिली. त्यानंतर महिलेच्या हातातील सोन्याच्या चार बांगड्या पॉलिश करण्यासाठी मागितल्या. बांगड्यांना पावडर लावल्यानंतर महिलेस बोलण्यात गुंतवून तिची दिशाभूल करून दुचाकीवरून पळ काढला. शिरपूर मर्चंट बँकेच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात दोघे कैद झाले आहे.

## उप्परपिंड गावात आमंत्रण देण्यावरून वाद

**धुळे ।** शिरपूर तालुक्यातील उप्परपिंड येथे हंबरसिंग सरदारसिंग राजपूत (वय ५५) यांना गावातील लक्ष्मण चिंतामण सैंदाणे, दादू लक्ष्मण सैंदाणे यांनी काठ्यांनी मारहाण केली. गावातील लोक मला आमंत्रण देतात; परंतु तू आमच्या घरी येऊन आमंत्रण का सांगत नाही, अशी विचारणा राजपूत यांनी केल्यामुळे ही मारहाण करण्यात आली. आहे.

# जे घरी बसून काम करतात, त्यांना जनता घरीच बसवते

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा घणाघात

## वंचित, उपेक्षितांना एकाच छताखाली मिळाला योजनांचा लाभ

### राज्यात ७५ लाख लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य

### महायुतीचे जोरदार शक्ती प्रदर्शन

**नाशिक । प्रतिनिधी**

लोकांच्या दारोदारी सरकार फिरतंय, अशी टीका काही विरोधक करू लागले आहेत. जे घरी बसून काम करतात, त्यांना जनताच घरी बसवते, असा टोला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता लगावत विरोधकांवर हल्लाबोल केला आहे. 'लोकांच्या दारोदारी सरकार फिरतंय, अशी टीका काही विरोधक करू लागलेल आहेत. खरं म्हणजे घरी जे बसतात, घरातून काम करतात. त्याच्याबद्दल मी काय बोलू इच्छित नाही. शरद पवार यांनी देखील त्यांच्या पुस्तकांमध्ये लिहिलेले आहे. घरी बसलेल्यांना जनता घरी बसवून टाकते आणि लोकांमधील कार्यकर्त्यांना लोकांमध्ये येण्याची संधी देते', असं टीकास्त्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवर सोडले आहे. दरम्यान आगामी स्थानिक स्वराज्य संस्था तसेच लोकसभा विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुती सरकारने काल जोरदार शक्ती प्रदर्शन केले असल्याचे यातून दिसून येते.

शासन आपल्या दारी या उपक्रमाच्या निमित्ताने नाशिक दौऱ्यावर आलेले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नाशिक शहर व जिल्ह्यासाठी महत्वाच्या असणाऱ्या तसेच रखडलेल्या अनेक प्रकल्पांबाबत घोषणा करीत ते मार्गी लावण्याची आश्वासने दिली. यात प्रामुख्याने रखडलेला नाशिक - पुणे हाय स्पीड रेल्वे मार्ग, नाशिक शहारातील निओ मेट्रो प्रकल्प, नदीजोड प्रकल्प, कुंभमेळा कोरिडॉर, सर्क्युलर कॉरिडॉर आदी प्रकल्प मार्गी लावण्याची आश्वासने नव्याने देण्यात आली.

नाशिक येथे 'शासन आपल्या दारी' या कार्यक्रमाच्या निमित्ताने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार आले होते. यावेळी कार्यक्रमात भाषणांमध्ये तसेच पत्रकार परिषदांमध्ये त्यांनी नाशिकच्या रखडलेल्या प्रकल्पांचा उल्लेख करून ते मार्गी लावणार असल्याचे आश्वासन दिले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निओ मेट्रो प्रकल्पाबाबत दिल्ली येथे तंत्रज्ञानाचे प्रमाणीकरण सुरू असून त्यानंतर नाशिकचा निओ मेट्रो प्रकल्प मार्गी लागेल, असे आश्वासन दिले. याशिवाय कुंभमेळा कॉरिडॉर उभारण्याचीही नवी घोषणा त्यांनी केली. एकंदरीतच आगामी महापालिका व अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पाहता लोकमत जिंकण्यासाठी मुख्यमंत्र्यांसह उपमुख्यमंत्र्यांनी घोषणा केल्या असल्याचे यातून दिसून येते. तर २०२४ मध्ये लोकसभा निवडणुकीमध्ये केंद्रात पुन्हा सत्ता स्थानी येण्यासाठी भाजपाने 'शासन आपल्या दारी' या माध्यमातून कंबर कसली असल्याचे दिसून येते.

यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बोलताना सांगितले की, शासन आपल्या दारी अभियान हा शासकीय कार्यक्रम राहिला नसून लोकचळवळ बनली आहे. या अभियानामुळे लोकांच्या जीवनात आमुलाग्र बदल झाला आहे. राज्यातील ७५ लाख लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर या अभियानाच्या माध्यमातून हास्य फुलले आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल येथे केले. शासन आपल्या दारी कार्यक्रमांच्या व्यासपीठावर कष्टकरी बांधकाम कामगार, (पान ३ वर...)












### उत्तर महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करू : फडणवीस

**उत्तर महाराष्ट्र पर्यायाने नाशिक जिल्ह्याला दुष्काळमुक्त करण्यासाठी गोदावरी व तापी खोऱ्यातून वाहून जाणारे पश्चिमेचे पाणी अडविण्यासाठी नार-पार प्रकल्पाच्या कामाला गती देण्यात येईल. त्यासाठी आवश्यक प्रमाणात निधी उपलब्ध करून देऊन खान्देशसह नाशिक, अहमदनगर ही जिल्हे कायमची दुष्काळमुक्त करण्यात येतील. पुढील तीन वर्षात नाशिक जिल्ह्यातील प्रत्येक शेतकऱ्याला दिवसाला बारा तास वीज उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना प्रभावीपणे राबविण्यात येईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिली.**

### जिल्ह्यातील प्रकल्पांच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देणार : ना.अजित पवार

**जिल्ह्यातील नार - पार प्रकल्प, गोदावरी नदी प्रदूषण मुक्त करणे, जिल्हा झोपडपट्टी मुक्त करणे, मुंबई - नाशिक समृध्दी मार्गाचे काम, ओझर विमानतळाचे काम, नाशिक - पुणे हाय स्पीड रेल्वे अशा विविध जिल्हा विकासाच्या पायाभूत प्रकल्पांना गती देण्यासाठी त्यांच्या विकासासाठी निधी उपलब्ध करुन दिला जाईल. त्याच प्रमाणे नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस अडचणीतून बाहेर काढण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.**

### शासन आपल्या दारी कौतूकास्पद : केंद्रीय राज्यमंत्री डॉ.भारती पवार

**केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभा शासन आपल्या दारी या उपक्रमातून गावोगावी पोहचविण्यात येत आहे. राज्यातील सर्वसामान्य नागरिकांसाठी असलेल्या योजनांचा लाभ त्यांना या उपक्रमातून मिळत असल्याने नागरिकांचा शासनावरील विश्वास दृढ होत आहे. सेवा, सुशासन व गरीब कल्याण संकल्पनेतून शासन कौतूकास्पद काम करत आहे. असे केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांनी सांगितले.**

## नाशिकरांवर लादलेली अवाजवी घरपट्टी रद्द करणार



### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आश्वासन

**नाशिक । प्रतिनिधी**

३१ मार्च २०१८ रोजी तत्कालीन नाशिक मनपा आयुक्त तुकाराम मुंढे यांनी एक अधिसुचना काढून १ एप्रिल २०१८ नंतर अस्तित्वात येणाऱ्या नवीन मिळकतींच्या घरपट्टीत जबरी वाढ केली होती. त्यामुळे नाशिक शहरात संतापाचा आगडबोंब उसळला होता. करवाढीचा निर्णय महासभा व स्थायी समितीला डावलून झाल्याचा आक्षेप नगरसेवकांनी घेत मुंडे यांचे निर्णय फेटाळले. महासभेने दोन वेळा करवाढ रद्द केली मात्र मुंढे हे करवाढीवर ठाम होते. अविश्वास ठराव आणल्यावर करवाढीची तीव्रता त्यांनी कमी केली.

नाशिक शहरातील औद्योगिक, वाणिज्य व रहिवासी घरपट्टीत जी अवाजवी वाढ झालेली आहे. या संदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना शिवसेनेच्या वतीने निवेदन देण्यात आले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या घरपट्टीच्या संदर्भात लवकरच नाशिक मनपा अधिकारी व पदाधिकाऱ्यांची बैठक मुंबई येथे घेतली जाणार असल्याचे सांगितले. एकाच दिवसात एकदम महसूल वाढवण्याचा हा प्रयोग योग्य नाही, आमचं सरकार हे सर्व सामान्यांचे सरकार आहे, नाशिकरांवर लादलेली ही अवाजवी घरपट्टी रद्द करण्याचे आश्वासन दिले.

### उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या वाढदिवसानिमित्त

## कामगंध सापळे वाटप, कॉटन असोसिएशन व केशरानंद उद्योग समूहातर्फे आयोजन

**धुळे । प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या ६३ व्या वाढदिवसानिमित्त शनिवार दि. २२ जुलै रोजी सकाळी ९ वा. शासनमान्य खासगी बाजार समिती बाम्हणे, दोंडाईचा येथे कॉटन असोसिएशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष अतुल गणात्रा यांच्या हस्ते मोफत कामगंध सापळे वाटपाचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला अमळनेरचे आ. अनिल पाटील यांची प्रमुख उपस्थिती असेल.

कॉटन असोसिएशन ऑफ इंडिया व केशरानंद उद्योग समूह यांच्या संयुक्त विद्यमाने जि.प. चे माजी उपाध्यक्ष तथा केशरानंद उद्योग समूहाचे एम.डी. ज्ञानेश्वर भामरे, माजी नगरसेवक रविराज भामरे, शिवराज भामरे, डॉ. महेंद्र बोरसे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. शिंदखेडा मतदारसंघातील ६३०० शेतकर्यांना प्रत्येकी सहा फॉर्मन ट्रॅप्सचे अर्थात कामगंध सापळ्यांचे



मोफत वाटप केले जाणार आहे. कपाशी पीकावरील बोंडअळीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी हे कामगंध सापळे वाटप केले जाणार आहेत. या कार्यक्रमासाठी कॉटन असोसिएशनचे डायरेक्टर रितु पंड्या, सुधीरकुमार मंत्री, माजी आ. रामकृष्ण पाटील, जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शामकांत सनेर, जि.प. कृषी विकास अधिकारी उज्वल गिरासे, उपविभागीय कृषी अधिकारी एस.बी. मालपुरे यांना विशेष अतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आले आहे. कार्यक्रमानंतर सुरुची भोजनाचीही व्यवस्था करण्यात आली आहे. शेतकरी बांधवांनी शेतात आवश्यक असणार्या मोफत कामगंध सापळे वाटपाचा लाभ घ्यावा असे आवाहन ज्ञानेश्वर भामरे यांनी केले आहे.

## नाशिकला मनपाला पूर्णवेळ आयुक्त मिळण्याची राष्ट्रवादीची मागणी


### माजी खासदार भुजबळ, शहराध्यक्ष ठाकरे यांनी दिले उपमुख्यमंत्री पवारांना निवेदन

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक महापालिकेत गेल्या तीन महिन्यापासून पूर्णवेळ आयुक्त नसल्याच्या कारणाने सर्वसामान्य जनतेच्या हिताची कामे होत नाहीत. नाशिकच्या विकासाच्या दृष्टीने पूर्णवेळ आयुक्त मिळावा अशा मागणीचे निवेदन माजी खासदार समीर भुजबळ व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष रंजन ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना काल दिले.

नाशिक महापालिकेच्या निवडणुका लांबणीवर पडल्याने डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांची प्रशासकपदी नेमणूक करण्यात आली. परंतु मे महिन्यात डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार हे प्रशिक्षणाकरिता गेल्यावर त्यांच्या जागी नाशिक विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार देण्यात आला. यानंतर दि. २ जून २०२३ रोजी डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार यांची साखर आयुक्त, पुणे येथे बदली झाल्यावर राधाकृष्ण गमे व त्यानंतर जिल्हाधिकारी गंगाथरन डी. यांच्याकडे मनपा आयुक्तपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला. विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे व जिल्हाधिकारी गंगाथरन डी.यांच्याकडील कामाचा व्याप बघता तसेच प्रशासकीय कारणास्तव नाशिक मनपा प्रशासक पदाचा अतिरिक्त कार्यभार मनपाच्या अतिरिक्त आयुक्त भाग्यश्री बानायत यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. यासंपूर्ण चक्रव्यूहात नाशिक मनपाला पूर्णवेळ आयुक्त न मिळण्याने अनेक महत्त्वाची कामे रखडली गेली आहेत.

अतिरिक्त आयुक्तांकडे कार्यभार असल्याने त्यांना धोरणात्मक



निर्णय घेता येत नाही. प्रशासकीय राजवटीत स्थायी समिती, सर्वसाधारण सभेचे अधिकार आयुक्तांकडे असतात. दर महिन्याला या सभा होऊन विकास कामांचे प्रस्ताव मार्गी लावली जातात. परंतु पूर्णवेळ अधिकारी नसल्याने अनेक विषय प्रलंबित पडले आहेत. प्रशासनाला निविदा प्रक्रिया अंतिम करता येत नाही. नाशिक शहरात यंदा कमी पर्जन्यमान झाल्याने धरणातील उपलब्ध जलसाठ्याचे काटेकोरपणे नियोजन करून घेण्यास सक्षम अधिकारी नाही. महापालिकेत जवळपास पाच हजार कंत्राटी कामगार कार्यरत असून इतर कामांकरिता पूर्णवेळ आयुक्त असणे आवश्यक आहे. पूर्णवेळ आयुक्तांची नेमणूक न झाल्यामुळे मनपाचा कारभार विस्कळीत झाला असून सर्वसामान्य नागरिकांची कामे रखडली आहेत. सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचे निर्णय घेण्याकरिता व नाशिक शहराचा विकासाला भर देण्याकरिता नाशिक महापालिकेत पूर्णवेळ आयुक्तांची नेमणूक करण्यात यावी अशी मागणी निवेदनात केली आहे.

# धुळे जिल्ह्याचा पालकमंत्री स्थानिकच हवा

राज्यातील राजकारणात गेल्या पंधरा दिवसांपासून मोठे बदल झाले. २ जुलै रोजी राष्ट्रवादी काँग्रेसपासून अजित पवार यांनी आपला वेगळा गट तयार करत उपमुख्यमंत्रीपद पटकवले. त्यानंतर अजित पवार यांना हवे असलेले अर्थ अन् नियोजन खाते त्यांना मिळाले. त्यांना हे खाती देऊ नये, असा दबाव शिवसेनेकडून होता. परंतु अखेर त्यांना ती खाती मिळाली. त्यामुळे आता पालकमंत्रिपदाच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. काहीही झाले तरी धुळे जिल्ह्याला बाहेरचा पालकमंत्री नको अशी येथील नागरिकांची अपेक्षा आहे.

गेल्या अनेक वर्षापासून विकासाची दूरदृष्टी असलेला पालकमंत्री जिल्ह्याला लाभला नाही. त्यामुळे धुळे आणि पालकमंत्री यांचा समिकरण कधी जुळलंच नाही. बहूतांश पालकमंत्री हे झेंडामंत्रीच ठरले आहेत. त्यामुळे सध्या सत्तेत असलेल्या शिंदे- फडणवीस- पवार यांचे सरकार आल्यानंतर जिल्हावासियांना पालकमंत्र्यांची उत्सूकता लागली आहे. पालकमंत्री पदी कोणाची नियुक्ती होते? याचीच चर्चा सध्या कार्यकर्त्यात होत आहे. कॉर्नर कट्टा किंवा इतर सार्वजनिक ठिकाणी गप्पांचा फड रंगला की पालकमंत्री पदाचा विषय निघालाच म्हणून समजा. जिल्ह्याला पालकमंत्री कोण मिळणार? असा प्रश्न एकाने उपस्थित करताच दुसर्याने जिल्ह्यातीलच कुणाला तरी संधी दिली जाईल, अशी पुश्ती दुसर्याने जोडली. चर्चेत दोन आमदारांची नावे पुढे आली. तिसर्याने मात्र कुणीही द्या..पण लवकर द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. जिल्ह्याच्या विकासात पालकमंत्र्यांची भूमिका महत्वाची असते. जिल्ह्याचा वेगवान विकास करण्यासाठी पालकमंत्री सक्रिय असणे गरजेचे आहे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे तो स्थानिक असणे अत्यावश्यक. जिल्ह्यांतील जनतेचा त्या पालकमंत्र्यांच्या बाबतीतला अनुभव फार चांगला नव्हता. सरकारने पालकमंत्र्यांची नियुक्ती करताना तो जिल्ह्यातीलच अनुभवी नेता द्यावा, अशी मागणी जिल्हावासीयांमधून जोर घरू लागली आहे.




### सकारात्मक विचाराने काम करणारे अधिकारी गरजेचे

**पालकमंत्री हा जिल्हा नियोजन समितीचा अध्यक्ष असतो. सरकारच्या माध्यमातून येणार्या निधीचा योग्य वापर करून सिंचन योजना, रस्ते, पूल, प्राथमिक शिक्षण, आरोग्ययंत्रणेत सुधारणा आदींना प्राधान्य देणे गरजेचे असते; मात्र मागील दहा वर्षात जिल्ह्यात काहीही महत्त्वाचे बदल झाले नाही. जिल्ह्याच्या विकासाचे केंद्र अर्थातच जिल्हा प्रशासन असते. तेथे चांगले पालकमंत्री आणि सकारात्मक विचाराने काम करणारे अधिकारी गरजेचे असतात. विविध मुद्द्यांना भिडण्याची क्षमता असणारी राजकीय आणि प्रशासकीय यंत्रणा गरजेची असते, ती ज्या जिल्ह्याला मिळते त्या जिल्ह्याचा विकास होतो हे वास्तव आहे; मात्र पाणीटंचाई, व्यापारासमोरील संकट, उद्योगवाढीचे आव्हान आणि जिल्ह्याच्या विकासात शासन आणि लोकप्रतिनिधी कमी पडले. मागील तीन- सागर वर्षे जिल्हा प्रशासन कोण चालवतोय, हेच लोकांना कळत नव्हते. त्यामुळे आतातरी चांगला पालकमंत्री मिळावा. अशी येथील नागरिकांची अपेक्षा आहे.**



शोध बातमी
पुरुषोत्तम पाटील
मुख्य उपसंपादक
मो.७०५७०१११२६

## लग्न होत नसल्याने २७ वर्षीय तरुणाची आत्महत्या

**धुळे । प्रतिनिधी**

शहरातील पारोळा रोडवर असलेल्या एका हॉटेलच्या बाहेर पाचोरा तालुक्यातील पिंपळगाव येथील तरुणाने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केली. भैय्या उर्फ वैभव देव (२७) असे या तरुणाचे नाव आहे. आत्महत्या करण्यापूर्वी नातेवाईकांशी बोलताना लग्न होत नसल्यामुळे आत्महत्या करणार असल्याचे त्याने सांगितले होते. धुळे तालुका पोलिस ठाण्यात तशी नोंद करण्यात आली आहे.

पाचोऱ्यापासून जवळ असलेल्या पिंपळगाव येथील भय्या उर्फ वैभव दिलीप देव हा शहरात आला होता. त्याने चुलत भावाला धुळे कृषी उत्पन्न बाजार समितीत जात असल्याचे सांगितले होते. तो शहरातील पारोळा रोडवरील हॉटेलजवळील एका लिंबाच्या झाडाखाली अत्यवस्थ स्थितीत आढळून आला होता. त्याने विषारी औषध प्राशन केले होते. ही घटना ९ जुलैला दुपारी चार वाजता घडली होती. त्याला हिरे रुग्णालयात दाखल केले होते. नातेवाईकांना वैभवने माझे लग्न होत नाही, त्यामुळे विष प्राशन केल्याचे सांगितले होते. वैभवची प्रकृती गंभीर होती. उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला. अकस्मात मृत्यूची नोंद झाली.

## शिक्षणाचा दर्जा घसरला

उच्च शिक्षणाकडे अधिक लक्ष पुरविताना, शिक्षणाचा पाया असलेल्या प्राथमिक शिक्षणाकडे होत असलेले दुर्लक्ष देशाचे भावी आधारस्तंभ असलेल्या मुलांच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे.

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागाने देशभरातील विविध राज्यांच्या शैक्षणिक कामगिरीचा आढावा घेणारा अहवाल जाहीर केला आहे. या अहवालातील निष्कर्ष महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्याच्या दृष्टीने शोभादायक नाहीत. याआधी अशा पाहणीत प्रथम क्रमांकावर असलेला महाराष्ट्र सातव्या स्थानावर आला आहे. कामगिरी मूल्यांकन अहवाल (परफॉर्मन्स ग्रेडिंग इंडेक्स) दर वर्षी प्रसिद्ध केला जातो. या अहवालातून देशातील शैक्षणिक दर्जाचे चित्र स्पष्ट होत असते. तब्बल १४ लाख ९० हजार शाळा, ९५ लाख शिक्षक आणि सुमारे २६ कोटी ५० लाख विद्यार्थी संख्या असलेली ही भारतीय शिक्षण व्यवस्था आहे. २०२१-२२ या शैक्षणिक वर्षातील शैक्षणिक प्रगतीचे मूल्यमापन या अहवालाद्वारे करण्यात आले आहे. या वर्षीच्या अहवालात सर्वाधिक गुण पंजाब व त्या खालोखाल छत्तीसगडला मिळाले आहेत, तर सर्वांत कमी गुण अरुणाचल प्रदेश, मेघालय आणि मिझोराम या राज्यांना मिळाले आहेत. शैक्षणिक गुणवत्ता निश्चित करण्यासाठी ७३ निकष ठरवण्यात आले होते. यात प्रामुख्याने अध्ययन निष्पत्ती, पायाभूत सुविधा, प्रशासकीय व्यवस्थापन, शिक्षक शिक्षण आणि प्रशिक्षण, समानता, उपलब्धता अशा घटकांचा विचार करून हे निष्कर्ष जाहीर झाले आहेत. या अहवालात महाराष्ट्राची पहिल्या क्रमांकावरून सातव्या क्रमांकावर घसरण झाली आहे. अर्थात २०२१-२२ मधील शैक्षणिक स्थितीवर आधारित हे मूल्यमापन झाले असल्याने त्याआधीच्या कोरोना काळात झालेल्या शैक्षणिक स्तरावरील एकूणच घसरणीचाही तो परिणाम असू शकतो. सध्याच्या शालेय शिक्षणाचे वास्तव चित्र दोन वर्षांनंतरच्या अहवालातून स्पष्ट होईल. अशा प्रकारचे मूल्यमापनावर आधारित निष्कर्ष करणारे विविध अहवाल दरवर्षी प्रसिद्ध होत असतात. त्यातून शिक्षणात सुधारणा घडवून आणण्यासाठी कोणते बदल करावयास हवेत त्याचे प्राधान्यक्रम काय असावेत याची दिशा स्पष्ट होऊ शकते. 'पीजीआय' अहवालातील निर्देशांकानुसार राज्यातील पुण्यासह सातारा, सिंधुदुर्ग, बीड, रत्नागिरी या जिल्ह्यांतील शैक्षणिक कामगिरी अतिउत्तम असल्याचे म्हटले आहे. त्या खालोखाल अहमदनगर, लातूर, मुंबई, नाशिक, औरंगाबाद, ठाणे आदी जिल्ह्यांतील शिक्षणातील कामगिरी उत्तम असल्याचे म्हटले आहे. शैक्षणिक कामगिरीचे मूल्यमापन करणारा असरचा अहवाल गेल्या जानेवारीत प्रसिद्ध झाला. त्याहूनही शिक्षणाचा प्रवास उलट्या दिशेने सुरू असल्याचे स्पष्ट झाले आहे. इयत्ता तिसरीतील शंभरपैकी जेमतेम २० मुले दुसरीचा धडा वाचू शकतात. महाराष्ट्रात अशा धडा वाचता येणार्या विद्यार्थ्यांचे प्रमाण आधीच्या ४२ टक्क्यांवरून २६.६ टक्क्यांवर घसरले आहे. महाराष्ट्रात तिसर्या इयत्तेतील किमान वजाबाकी करू शकणार्या विद्यार्थ्यांचे प्रमाण २०१८ मध्ये २७.२ टक्के होते, ते अवघ्या चार वर्षांत १८.७ टक्के झाले. एकाच वर्ग खोल्यात अधिक इयत्तेतील मुले बसवण्याचे प्रमाण वाढले आहे. अनेक शाळांमधून मूलभूत सुविधांचाही अभाव आहे. त्यातही ग्रामीण आणि शहरी भागातील शिक्षण व्यवस्थेतील दरी अधिक रुंदावत असल्याचे दिसून येते. शहरात शिक्षण घेण्यासाठी येणार्यांचे प्रमाण वाढत आहे. मात्र, शहरातील शिक्षण खर्चिक असल्याने ते परवडणारे नसते. शिक्षणाबद्दल राज्यकर्त्यांमध्ये असलेली अनास्था आणि शिक्षणाबद्दलचे धरसोडीचे धोरण याचाही मुलांच्या प्रगतीवर आणि शिक्षण व्यवस्थेवर परिणाम होतो हे विसरता येत नाही. विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची पातळी न तपासता सरसकट सर्वांना उत्तीर्ण करण्याचे धोरण असो की, परीक्षाच न घेता मुलांना वरच्या वर्गात पाठवण्याचा निर्णय असो. अशा निर्णयातून विद्यार्थ्यांचे भविष्य अंधकारमय होण्याचीच भीती अधिक. शिक्षण क्षेत्रात काम करणार्या तज्ज्ञांकडून शिक्षण सुधारणेबाबत सूचना येत असूनही त्याकडे राजकीय नफा-तोट्याची गणिते मांडणार्यांकडून सर्रास दुर्लक्ष होते. यातून आपल्या पिढ्यांचे आपणच नुकसान करीत आहोत, व भविष्यकालीन समस्यांना सामोरे जाण्यापासून त्यांना रोखत आहोत, याचाही गांभीर्याने विचार व्हायला हवा.

# चला पाऊस अनुभवू या



माझ्या वडिलांपासून पावसाचे वेड आणि आकर्षण माझ्यात आले असावे. माझे वडील पाऊस येत असताना आमच्या निमगुळ, दोंडाईचा व नाशिकच्या बंगल्यासमोर खुर्चीत बसून पाऊस न्याहळत बसत व सतत आता या बाजूने पाऊस पडतो आहे ,त्या बाजूने पाऊस पडतो आहे, पाऊस फिरला अशी त्यांची कॉमेंट्री सुरू असे. पावसाळ्यात मनसोक्त लॉन्ग ड्राईव्हला जाऊन मी दरवर्षी नाशिक जिल्ह्यातील जवळजवळ सर्वच रस्त्यांवर फिरून, थांबून ,पाऊस अंगावर घेऊन, पाऊस अनुभवतो! मला भावलेले काही पावसाळी रस्ते व गावे

इगतपुरी- भावली- टाकळी- धामणगाव

इगतपुरी पासून हायवेतून वळण घेवून तुम्ही भावली धरण रस्त्याला लागतात व या रस्त्याने तीर्थक्षेत्र टाकळी पर्यंत सिहस्थामुळे अतिशय उत्तम रस्ता झाला आहे .सोमवार ते गुरुवार या रस्त्यावर फारशी वाहतूक नसते .शनिवार व रविवारी मात्र पुणे, मुंबई ,नाशिक जिल्ह्यातील लोकांची या रोडवर एवढी गर्दी होते ही पोलीस बंदोबस्त लावावा लागतो .ऑगस्ट महिन्यात या संपूर्ण रस्त्यावर धबधबे कोसळत असतात. नद्या,नाले भरभरून वाहत असतात. संपूर्ण इगतपुरी तालुक्यात ३५० सेंटीमीटर पाऊस पडतो. संपूर्ण महाराष्ट्रात १०० सेंटीमीटर पाऊस पडतो. संपूर्ण महाराष्ट्राच्या सरासरी पावसाच्या जवळजवळ तिप्पट चौपट पाऊस येथे पडतो .त्यावरून आपल्याला येथे पडणाऱ्या पावसाचा अंदाज यावा. संपूर्ण परिसर आदिवासी वस्तीचा असल्यामुळे मधेमधे थांबून तुम्हाला आदिवासी बांधवांच्या हातचा चहा, भजी, व जेवण मिळते. आता तर इथे खूप मोठ्या प्रमाणावर रिसॉर्ट, हॉटेल झाले आहेत. भारतातील सर्वोत्तम पावसाळी पर्यटन स्थळांपैकी हा रस्ता आहे. संपूर्ण रस्तात मधेमधे थांबत, धबधब्याचे पाणी अंगावर घेत, संपूर्ण दिवसभर तुम्ही पावसाचा कुटुंबासहित आनंद घेऊ शकतात.

माळशेज घाट

नाशिक पुणे महामार्गावर नगर कल्याण रस्त्यावर माळशेज घाट आहे. पुणे जिल्ह्याच्या बॉर्डरवर व ठाणे जिल्ह्याला लागून असलेला हा नितांत सुंदर डोंगरी रस्ता आहे. अतिशय सुंदर धबधबे जुलै ,ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यात वाहत असतात. फार उंचीवरून कोसळणारे पाणी अंगावर घेत तुम्ही पावसाळी पर्यटनाचा आनंद घेवू शकतात. महाराष्ट्र शासनाने वाहनतळ उभे केले आहेत. तसेच अनेक रिसॉर्ट, हॉटेल या परिसरात झाले आहेत. चहा ,भजी, मक्याचे कणीस विकणारे तर जागोजागी असतात. या रस्त्याला पावसाळ्यात जरूर भेट द्यावी.

मांडू ,मांडवगड मध्य प्रदेश

मांडवगड मध्यप्रदेश मधील प्रसिद्ध पर्यटन स्थळ आहे .मांडवगडचा पाऊस अनुभवण्यासाठी संपूर्ण भारतातून लोक येथे गर्दी करतात. परिसरात अनेक धबधबे आहेत. राहण्याची ,जेवणाची उत्तम सोय आहे. मुंबई आग्रा हायवेवर नासिक पासून तीनशे किलोमीटरवर मांडवगड आहे . येथील पावसाळा चिरस्मरणात राहतो. मंडुला गेलात की मग निवांतपणे ऑगस्ट महिन्यात दोन-तीन दिवस थांबा .नितांत सुंदर ठिकाण आहे.

मुंबई ते तळ कोकण



शब्द संवाद

प्राचार्य प्रशांत पाटील

(नाशिक) मो.९५११८५९९३९

नवी मुंबई सोडले की संपूर्ण मुंबई ते गोवा हायवे पावसाळी पर्यटना करता उत्कृष्ट मार्ग आहे. तळ कोकणात तर आंबोली घाटा सारखे कितीतरी पाऊस अनुभवण्याकरता भेट देण्यासारखे अनेक स्थळे आहेत .परंतु या ठिकाणी बऱ्याच वेळा दरडी कोसळतात. रस्ते बंद होतात. त्यामुळे या ठिकाणी सावधपणे जायला हवे

गुवाहटी -शिलाँग -चेरापुंजी

खरे म्हणजे गुवाहटी हे पावसाळी पर्यटन करता उत्कृष्ट ठिकाण आहे. येथून मेघालयची राजधानी शिलाँगला जाणारा रस्ता हा संपूर्ण डोंगरी रस्ता आहे. संपूर्ण दिवसभर पाऊस अंगावर घेत तुम्ही शिलाँगला थोडा वेळ थांबून ,भारतातील सर्वात जास्त पाऊस पडणाऱ्या चेरापुंजीला पोहोचतात. संपूर्ण रस्त्यात खाण्यापिण्याच्या उत्तम सोयी आहेत. पाऊस म्हणजे काय असतो ते अनुभवायचे असेल तर चिरापुंजीला जा. पाऊस नुसता कोसळत नाही तर प्रलय म्हणजे काय याची आठवण होते. अगदी १०० मीटर वरचे तुम्हाला दिसत नाही. निसर्गाचे अद्वितीय वरदान लाभलेला हा संपूर्ण परिसर आहे. पावसाळी सहलीसाठी भारतात अनेक सर्वोत्तम स्थळ आहेत परंतु सगळीकडे आता शुक्रवार शनिवार रविवार फार मोठी गर्दी असते. त्यामुळे आपल्याला फारसा आनंद घेता येत नाही. त्यामुळे पावसाळी सहलीला जाताना शक्यतो सोमवार ते गुरुवार जावे. बऱ्याच वेळा धबधब्यांचा अंदाज येत नाही ,त्यामुळे सावधपणे मुख्य रस्त्यापासून फार अंतरावर जाऊ नये. घराबाहेर पडून, पाऊस अंगावर घेत, धबधब्याखाली भिजत, मधेमधे थांबून चहा, भजीचा आनंद घेत, लाँग ड्राईव्ह ला जाण्यासारखा आयुष्यात आनंद नाही!

# भांडवलाचा चांगला वापर करा - संत राजिन्दर सिंह जी महाराज

दैनंदिन जीवन जगताना अनुकूल आणि चांगली परिस्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. यासाठी आपण काय करावे, हे आपल्याला माहीत आहे का? सत्य, अहिंसा, पवित्रता, नम्रता आणि निःस्वार्थ सेवा, हे गुण आपल्या जीवनात आत्मसात केले पाहिजेत, असे सर्व संत-महापुरुषांनी सांगितले आहे. यासोबतच ध्यान-अभ्यासालाही वेळ दिला पाहिजे. प्रत्येक वेळी जेव्हा जेव्हा आपल्या मनात कोणतीही चुकीची कृती, शब्द किंवा विचार उद्भवतो, ज्यामुळे आपल्या अध्यात्मिक प्रगतीमध्ये अडथळा येतो, तेव्हा ते त्याच वेळी मुळापासून उपटून टाकले पाहिजे, म्हणजेच ते अगदी सुरुवातीस थांबविले पाहिजे.

पिता-परमेश्वराने आपल्याला आपल्या श्वासाची अमूल्य पुंजी दिली आहे, जी आपल्या अध्यात्मिक उन्नतीसाठी आपण वापरली पाहिजे. या उलट, जर आपण आपले लक्ष बाह्य जगावर केंद्रित केले तर काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकार हे आपल्यातील ही संपत्ती लुटतील. म्हणूनच आपली खरी संपत्ती लुटणारे आणि आपला खजिना लुटणारे चोर समजून आपण आपल्या चुका समजून घेतल्या पाहिजेत. त्यांनी आपल्याला लुटण्याचा प्रयत्न केला तरी आपण खंबीरपणे उभे राहून आपल्या अमूल्य खजिन्याचे रक्षण केले पाहिजे आणि चोरांना आपल्यावर विजय मिळवू देऊ नये.

आपण याकडे लक्ष दिले तर आपल्यातील दोष आपण दूर करू शकतो. अशाप्रकारे, आपण दिवसभर आपले मन शांत ठेवू शकतो आणि जेव्हा आपण ध्यान-अभ्यास करण्यासाठी बसू तेव्हा आपल्याला दोन डोळ्यांच्या भ्रुकुटीच्या मधील शिवनेत्रावर ध्यान सहज टिकविता येईल. मग आपण पाहू की आपली अध्यात्मिक प्रगती दिवसें-दिवस होत आहे.

पूर्ण महापुरुषाकडून दीक्षा घेणाऱ्यानी नामदानाच्या वेळी मिळालेल्या पुंजीचे महत्व समजले पाहिजे. हि पुंजी आपण रोज वाढवण्याचा प्रयत्न करून ती कमी होऊ देऊ नये. आपण योग्य प्रकारे या पुंजीची गुंतवणूक केली पाहिजे म्हणजेच आपले लक्ष पिता-परमेश्वराकडे वळविले पाहिजे जेणेकरुन दररोज वृद्धिंगत होईल.




या भांडवलाचा सदुपयोग करून सद्गुणांच्या संपादनातील उणिवा दूर करून त्या मध्ये नियमित चिंतन करून गुंतवणूक करता येते. आपण त्याचा रोज सराव करून स्वतः अनुभवू या. अध्यात्म हे एक शास्त्र आहे. त्याच्या प्रक्रियेचे योग्य पालन केल्यास आपल्याला निश्चितच फळ मिळत राहील.

जेव्हा आपण अध्यात्मिक मार्गावर प्रगती करतो तेव्हा आंतरिक ज्योति आणि श्रुतिचा अनुभव घेणे ही फक्त सुरुवात आहे. तो आपल्याला अशा आनंदाकडे घेऊन जातो जो या जगात कुठेही मिळत नाही. जेव्हा आपण दिव्य ज्योति आणि श्रुतिच्या प्रवाहाच्या संपर्कात येतो आणि सद्गुरुंच्या दिव्य स्वरूपापर्यंत पोहोचतो. तेव्हा आपल्याला इतका आनंद आणि सुखाची प्राप्ती होते ज्याच्या पलीकडे या जगातील सर्व सुखे किंवा आनंद त्याच्या पुढे फिक्के पडतात. आपल्या सद्गुरूंचे तेजोमय दर्शन आपल्याला दैवीआनंद, सुख आणि उल्हासाने भरून टाकते.

हा अध्यात्मिक अनुभव इतका रोमांचकारी असतो की जेव्हा आपण आपल्या अंतरी असलेल्या प्रभू-परमेश्वराच्या दिव्य मंडळात अमर्याद वेगाने उड्डाण करतो. तेव्हा असे वाटते की जणू प्रभु- परमेश्वर आपल्या आत्म्याला त्याच्या दिव्य दर्शनाचा वर्षाव करीत आहे आणि मग आपल्या प्रत्येक श्वासात प्रभु-परमेश्वराच्या प्रेमाची दैवी ठिणगी आपल्याला जाणवते. एकदा का हा दैवी अनुभव प्राप्त झाला की मग आयुष्यभर आपण या दिव्य अनुभवाच्या आनंदाच्या लहरींमध्ये डुंबत राहतो. हा कायमस्वरूपी खजिना आपल्या अंतरी विद्यमान आहे तो आपल्या खूप जवळ असतो. हा अनुभव घेण्यासाठी आपल्याला कुठेही जाण्याची गरज नाही.

पमानन्द आणि प्रेम आधीच आपली वाट पाहत आहेत. आपल्याला फक्त नैतिक दोष दूर करण्याचा आणि आपल्या मनाला भटकविण्यापासून थांबविण्याचा संकल्प करायचा आहे. यासह दररोज ध्यान-अभ्यासासाठी वेळ दिला पाहिजे आणि अध्यात्मिक धन-दौलतीचा अनुभव घेतला पाहिजे. संत-महापुरुषांनी आपल्याला आवश्यक ते सर्व दिले आहे, ते आपल्याला प्रयत्न आणि प्रोत्साहित करण्यासाठी शक्य ती सर्व मदत करतात. त्यांचे प्रेम, त्यांची कृपा आणि त्यांची प्रेमपूर्ण नजर आपल्याला अंतरी उभारी देण्याकरिता सतत आपल्यावर वर्षाव करीत असते. आपले मन शांत करण्यासाठी आणि आपल्या आत्म्याला ग्रहणशील बनविण्यासाठी त्यांनी आपल्याला दिलेली साधने वापरायची आहेत. जर आपण असे केले तर आपण दिव्य ज्योति आणि श्रुतिच्या दैवी खजिन्याने मालामाल होऊ आणि प्रेम आणि आनंदाने दिव्य मंडलात झेप घेऊ शकू. चला तर, आपण आपले आंतरिक अनुभव विकसित करू या! जेणेकरून आपण दैवी प्रेम आणि प्रकाशाच्या निवास स्थानापर्यंत पोहोचू शकू. तिथे गेल्यावर आपल्याला एक खजिना मिळेल, जो कायम स्वरूपी आपल्यासोबत राहील, ज्याला आपण आपल्या हृदयात आणि आत्म्यात जपून कुठेही नेऊ शकू. कोणत्याही क्षणी त्या दैवीशक्तिच्या आणि प्रेमाच्या खजिन्याचा केव्हाही पूर्णआनंद घेऊ शकू.

## शब्दकोडे-१२१



आडवे शब्द

१. पूर्ण बंदोबस्त ४. पुष्कळ ७. नम्रतेने मान खाली घालणे ११. एक पालेभाजी व खाद्य तेल १३. उष्ण, कढत १५. गंध १६. ओरखडा १८. डाळीचे कालवण २०. सोने २२. खोदण्याचे काम २४. सीतापती २५. सोन्याचा कस २६. बागवान २७. सोन्याची कांब २९. पहिला ऋतू ३१. चित्रपटाचा हिरो ३२. मर्कट ३४. आराम --- है! ३५. कठीण (प्रसंग) ३६. भीती ३८. हे मीठ देखील अळणी असते ४०. छोटा लहान ४२. सरसकट ४६. नाश, नेस्तनाबूत ४७. मातापिता ५०. पाण्यातील फूल ५२. गाव, शहर ५३. मिजास, डौल ५५. एकाग्र नजर ५६. जास्तीत जास्त व कमीत कमी ६०. वय ६१. रविवासर ६२. शर्त, पण ६४. मंत्रीमंडळ ६६. देवाणघेवाण ६८. मोठ्या पानांची एक पालेभाजी ७०. मठाची चव ७१. च्यासह, च्या बरोबर ७३. बारीक दगड ७४. श्रीरामाचे स्तोत्र ७७. हूल देणे म्हणजे अशी हाळी ८१. अंजन ८२. कारस्थानी ८३. नवरदेव ८४. गार, थंड ८५. अरण्य

उभे शब्द

१. किंचित कडू २. परशुरामाची भूमी ३. टिंगल ४. खराब ५. तपास, शोध ६. स्पष्ट, सडेतोड ८. तेव्हा (ग्रा.) ९. चर्चा १०. केर १२. कोवळी फांदी १४. अंत:करण १७. नमस्काराची हाळी १९. मंडणी करणारा २१. चिवचिवाट २३. नूतन २६. मर्कट, कपि २८. डोंगरी किल्ला, डोंगर ३०. अनुमती ३३. संकटाची छाया ३४. दिलेली खात्री ३४अ. कडक, खरखरीत ३५. बाळाची गाडी नाव वडिलांचे! ३७. जीभ ३८. श्वासाचा अवयव ३९. महाराणा प्रताप यांच्या घोड्याचे नाव ४१. अक्षराचा उच्चार बदलणारी चिन्हे ४३. वटवट, त्रास ४४. फक्त, केवळ ४५. दुधाच्या वड्या ४७. जळजळीत, अत्यंत तीव्र ४८. जन्म ४९. पर्वत ५१. दहावी रास ५४. युद्ध ५६. व्यायाम ५७. ठोक! हाण! ५८. गडकरी ५९. अफूचे बी ६२. अभिनेता ६३. हजार किलो ६५. भांड्याला पडलेला खड्डा ६६. कुस्तीची जागा ६७. नृत्यकलेची जागा ६९. लक्ष्मीचे एक नाव ७२. अखेर, शेवट ७३. दर्यावर्दी ७५. मळलेला ७६. धुणे (संस्कृत) ७८. खेडे ७९. अजगर ८०. रेष ८१. आजच्या आधीचा दिवस

## शब्दकोडे १२० चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.ढाल तलवार ४.नकलाकार ७.चाक ९.पेशा १०.सासर १२.रमा १३.गडगडाट १६.रुबाबदार १८.वाटचाल १९.जर २१.जड २२.खेळ २३.पोवाडा २५.तास २७.बळकट ३०.ओ ३१.टकटक ३२.रगड ३३.तारवटणे ३६.गीताई ३९.टक ४०.फसगत ४२.तर ४३.वातहारक ४५.माळ ४७.कानस ४९.काळ ५०.तडकाफडकी ५२.सामनावीर ५३.कनात ५४.आब ५५.अवयव ५६.पडसाद ५८.विडा उचलणे ६१.यातना ६३.वारा ६४.सरदार ६६.रुकार ६८.मालक ७०.नवलकोल ७४.रद्द ७६.वर्ण ७७.तार ७८.कलाकार ७९.बाधणे

**उभे उत्तर**

१.ढालगज २.तरंग ३.वाईट ४.नशाबाज ५.कासार ६.रस ७.चारचाकी ८.कमाल ९.पेरु ११.रवाळ १४.डरपोक १५.डाकोडाक १७.बडबडगीत २०.माता २२.खेटर २४.वाटण २६.सरबत २८.कताई २९.पोट ३१.टवटवीत ३४.वसंत ३५.डोस ३७.तारकानाथ ३८.नकळत ४०.फळफळावळ ४१.गळकी ४३.वासर ४४.रकाना ४५.माका ४६.कसाबसा ४८.नवी ५१.डरावडराव ५३.कवच ५४.आड ५६.पदर ५७.दया ५८.विनाकरण ५९.उभा ६०.लवलवणे ६२.तरु ६३.वानर ६४.सल ६५.दादला ६७.रद्द ६९.कर्ण ७१.लता ७२.कोर ७३.सूर ७५.डबा

## एसटी आगाराकडे लक्ष कोण देणार?

मागील आठवड्यात मुंबई - गोवा या राष्ट्रीय महामार्गावरून दोन वेळा प्रवास केला. पनवेलपर्यंत रस्ता समाधानकारक असला तरी पुढे अजून बरेच काम अपूर्ण आहे. तेव्हा नवीन ड्रायवर असेल तर गाडी चालविताना तारांबळ उडते. त्यात लालपरीने जाताना आनंद काही वेगळाच असतो. मात्र प्रत्येक आगारात हजेरी लावून पुढे जाणाऱ्या लालपरीच्या आगारांची परिस्थिती पाहून आगारातून बाहेर पडताना नागरिकांमध्ये नाराजीचा सूर दिसून येतो. आता राज्यात ट्रिपल इंजिनचे व दोन उपमुख्यमंत्री असलेले सरकार आहे. तेव्हा राज्य सरकारने गरिबांच्या लालपरीचा रथ चालू राहण्यासाठी एसटी आगारांकडे प्राधान्याने लक्ष दिले पाहिजे. खासगी वाहतूकदार कशा प्रकारे सणासुदीच्या काळात पैशांची लयलूट करतात याची सर्वांनाकल्पना आहे.

महाराष्ट्राच्या राजधानीला स्वच्छ आणि निरोगी करण्यासाठी मुंबई महापालिकेने सुशोभीकरण करण्याचे काम हाती घेतले आहे. यामध्ये मुंबईतील रस्ते, पूल, फुटपाथ, उद्याने, समुद्रकिनारे, तसेच शहरातील स्वच्छता, सुधारणा, सुशोभीकरण, आकर्षक प्रकाश योजना अशी कामे हाती घेतली आहेत. त्याचप्रमाणे राज्यात राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम सुद्धा चालू आहे. तेव्हा सरकारने प्रवाशांच्या सेवेसाठी एसटी आगारांचे सुशोभीकरण करणे गरजेचे आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ हे जरी नाव असले तरी 'एसटी' हे नाव जास्त प्रचलित आहे. ही महाराष्ट्र राज्यात रस्त्यांवरून प्रवासी वाहतूक करण्यासाठी स्थापन झालेली राज्य सरकारची कंपनी आहे. एसटी कर्मचाऱ्यांचा २८ ऑक्टोबर, २०२१ पासून सुमारे साडेपाच महिने आपल्या न्याय मागण्यांसाठी बेमुदत संप केला होता. त्यावेळी राज्यातील सर्वसाधारण जनतेची काय हालत झाली याचा सर्वांनी अनुभव घेतला असेल. त्यात ग्रामीण भागातील जनतेचे अतोनात हाल झाले. तेव्हा आगारात उभी असलेली लालपरी प्रत्येकाच्या डोळ्यांसमोर दिसत होती. आपल्या राज्यात राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम चालू आहे. त्याप्रमाणे एसटी आगाराची सुद्धा काळजी घेणे गरजेचे आहे. विशेषत: कोकण पट्ट्यात ये - जा करीत असताना एसटी आगारात गेल्यावर त्याची कल्पना येते. तेव्हा प्रवाशांच्या दृष्टीने रस्ता महत्त्वाचा तसे एसटी आगार सुद्धा महत्त्वाचे आहे.

**क्रमशः**

**- रवींद्र तांबे**

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# इंडिगो पार्कजवळील जॉगिंग ट्रॅक विकसित करा; अन्यथा जनआंदोलन

**शिवसेना, सत्कार्य फाउंडेशनचा इशारा**

**नाशिक । प्रतिनिधी**





गोविंदनगर, सद्गुरूनगर येथील इंडिगो पार्कजवळील जॉगिंग ट्रॅक प्रायोजक अथवा महापालिकेकडून विकसित करावा, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष व सत्कार्य फाउंडेशनने केली आहे. याबाबत महापालिका आयुक्तांना निवेदन देण्यात आले आहे. दखल न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

नाशिक महापालिका स्थायी समिती सभा क्रमांक २८ मध्ये विषय व ठराव क्रमांक १००८ हा २८ फेब्रुवारी २०२२ रोजी मंजूर करण्यात आला. श्रीजी ग्रुपतर्फे अंजनभाई पटेल, नाशिक यांचेकडून इंडिगो पार्कजवळील जॉगिंग ट्रॅक सुशोभिकरण करणे व देखभाल करणेस या ठरावान्वये मंजुरी देण्यात आली. सतरा महिने उलटूनही याबाबत कुठलीही कार्यवाही झालेली नाही. संबंधित प्रायोजकाने महापालिकेला अद्याप याबाबतचा प्रस्तावही सादर केलेला नाही. त्याबाबत कार्यवाही करून संबंधितांकडून हा जॉगिंग ट्रॅक विकसित करण्याचे काम सुरू करावे, ते शक्य नसल्यास महापालिकेच्या खर्चातून हा जॉगिंग ट्रॅक विकसित करावा.

यासंदर्भात यापूर्वी २४ एप्रिल २०२३ रोजी निवेदन देण्यात आले होते, त्याची दखल घेण्यात आली नाही. ४ जुलै २०२३ रोजी पुन्हा निवेदन देण्यात आले. त्वरित निर्णय घेवून काम सुरू करावे, अन्यथा जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा सत्कार्य फाउंडेशनचे अध्यक्ष बाबासाहेब गायकवाड (देशमुख), शिवसेना कार्यकर्त्या चारुशीला गायकवाड (देशमुख), बाळासाहेब मिंधे, मयुर आहेर, धवल खैरनार, संगीता देशमुख, प्रभाकर खैरनार, रवींद्र सोनजे, विनोद पोळ, डॉ. शशीकांत मोरे, निलेश ठाकूर, विठ्ठलराव देवरे, भालचंद्र रत्नपारखी, ओमप्रकाश शर्मा, बाळासाहेब देशमुख, अशोक देवरे, दिलीप निकम, बापूराव पाटील, भारती देशमुख, वंदना पाटील, रूपाली मुसळे, दीपक दुट्टे, राहुल काळे, पुरुषोत्तम शिरोडे, तेजस अमृतकर, हरिष काळे, प्रथमेश पाटील आदींसह रहिवाशांनी दिला आहे. या निवेदनाची प्रत महापालिका बांधकाम विभागाचे शहर अभियंता शिवकुमार वंजारी यांना देण्यात आली आहे.

**अतिक्रमण नको**

यापूर्वी एका बांधकाम व्यावसायिकाने अनियमित बांधकाम करून जॉगिंग ट्रॅकवर म्हणजेच मनपाच्या ताब्यात असलेल्या पाटबंधारे खात्याच्या जागेवर अतिक्रमण करून इमारतीसाठी प्रवेशद्वार जॉगिंग ट्रॅकवरून केले आहे. आता वरील प्रायोजकाचे मोठे बांधकाम या जॉगिंग ट्रॅक लगत सुरू आहे. त्याचे अतिक्रमण होवू नये. जॉगिंग ट्रॅककडून बांधकाम साईटला प्रवेश देण्यात येवू नये. तसे झाल्यास जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

# पवननगरला मनसेची एक सही संतापाची

**नाशिक । प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेना नविन नाशिक (सिडको ) विभागाच्या वतीने राज ठाकरे, अमित ठाकरे यांच्या आदेशाने महाराष्ट्रातल्या राजकारणात अशा प्रकारे झालेला चिखल आणि त्याच्यामुळे जनतेचा झालेला संताप तसेच सर्वसामान्य जनतेला व्यक्त होता यावे, महाराष्ट्राच्या जनतेचा संताप संपूर्ण महाराष्ट्रासमोर यावा यासाठी एक सही संतापाची हा उपक्रम पवननगर येथे राबविण्यात आला.

याप्रसंगी प्रदेश सरचिटणीस अशोक मुर्तडक, प्रदेश उपाध्यक्ष पराग शिंत्रे, कामगार सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष सलीम मामा शेख, जिल्हाध्यक्ष अंकुश पवार, शहराध्यक्ष दिलीप दातीर, माजी नगरसेवक योगेश शेवरे, प्रदेश उपाध्यक्ष सुजाता डेरे पदाधिकारी व महाराष्ट्रसैनिक परिसरातील नागरिक उपस्थित होते.

**ॲड. संतोष बी. बोरसे**
**निशाणी नं.६**

**जाहिर नोटीस**

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश क. स्तर. सो. यांचे कोर्टात.**

**दि.कि.अर्ज नं.८५९/२०२३**

रेखा रविंद्रनाथ बाविस्कर वगैरे .....**अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही**

(कै. रविंद्रनाथ जगन्नाथ बाविस्कर -मयत) ...**जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश ( व . स्तर) सो. यांचे न्यायालयात दि. १३/७/२०२३ रोजी दि. कि. अर्ज नं. ८५९/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी अर्जदार यांनी कै. रविंद्रनाथ जगन्नाथ बाविस्कर यांचा वारस दाखला मिळणेकरीता अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौ. दि. २८/०८/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. क. स्तर कोर्ट नं. ४ यांचे न्यायालयात उक्त निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण - धुळे
दिनांक :- १४/०७/२०२३ आदेशावरुन

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.** **दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.**

# बेकायदेशीर होर्डिंग, पक्षाचे झेंडे लावून नाशिक शहर विद्रुपीकरण करणाऱ्यांवर तातडीने कारवाई करा

**आम आदमी पार्टीची मागणी**

**नाशिक । प्रतिनिधी**




नाशिक शहरामध्ये शासन आपल्या दारी या उपक्रमाअंतर्गत नाशिक शहरभर शिवसेना, भाजपा आणि राष्ट्रवादी या पक्षांनी मोठ-मोठी होर्डिंग्ज आणि झेंडे लावून शहराचे विद्रूपीकरण केले आहे. त्या संदर्भात कारवाई करण्यात यावी अशी मागणी आम् आदमी पार्टीतर्फे करण्यात आली आहे. या मागणीचे बॅनर हातात घेऊन आम आदमी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी नाशिक महापालिकेच्या गेट बाहेर उभे राहून निषेध व्यक्त केला आहे.

नाशिक शहरात डोंगरे वसतीगृह मैदान या ठिकाणी शासन आपल्या दारी हा कार्यक्रम झाला. सत्ता पक्षात असलेले तीनही पक्ष म्हणजे शिवसेना, भाजपा आणि राष्ट्रवादी यांच्या पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी नेत्यांचे स्वागत करण्यासाठी मोठ मोठे बोर्ड आणि पक्षाचे झेंडे शहरभर लावलेले आहेत. यामुळे शहराचे विद्रूपिकरण झालेले असून सर्वसामान्य नागरिकांना वाहतुकीला अडथळा निर्माण झालेला आहे. तसेच यामुळे अपघात देखील होऊ शकतात. तसेच या सर्व अनधिकृत असलेल्या होल्डिंगवर आणि आयोजकांवर नाशिक मनपाकडून तातडीने कारवाई करण्यात यावी आणि सत्ताधारी पक्षाचे कार्यकर्ते व आयोजक जरी सत्ता पक्षाचे असले तरी कायदे आणि नियम हे सर्वांना समान आहेत. नाशिक मनपा आपल्या कर्तव्यास बांधील आहे. आपण या सर्वांवर कारवाई करून कायदा सर्वांसाठी सारखाच आहे याचे उदाहरण आपण जनतेसमोर घालून द्यावे. ही आप नाशिकची मुख्य मागणी आहे. आम आदमी पार्टीने या सर्व प्रकाराचा अतिशय तीव्र शब्दात आणि तक्रार करीत निषेध व्यक्त करीत असल्याचे म्हटले आहे.

यावेळी आपचे पदाधिकारी जितेंद्र भावे, प्रभाकर वायचाळे, योगेश कापसे, राजेंद्र गायधनी, संजय कातकडे, विनायक येवले, प्रदीप लोखंडे, अमोल लांडगे, अनिल कौशिक, स्वप्नील घिया, रघुनाथ चौधरी, सोमा कुर्हाडे, प्रतीक पवार,अमित यादव, योगेश देशमुख, गोरखनाथ मोहिते आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# ...जे घरी बसून काम करतात, त्यांना जनता घरीच बसवते

**(पान १ वरुन...)** बचतगटाच्या महिला, तृतीयपंथीय, विद्यार्थी, सरपंच अशा समाजातील सर्व घटकांच्या लाभार्थ्यांना मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मानित करून व्यासपीठावर बसण्याची संधी मिळाली. हे या कार्यक्रमाचे आगळं-वेगळं वैशिष्ट्ये होते.

डोंगरे वसतिगृह मैदान येथे 'शासन आपल्या दारी' या अभियानाचा नाशिक जिल्हास्तरीय कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी मुख्यमंत्री शिंदे बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री डॉ. भारती पवार, विधान परिषदेच्या उप सभापती डॉ. निलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, ग्रामविकास, पंचायत राज आणि पर्यटनमंत्री गिरीष महाजन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री दादाजी भुसे, उद्योग मंत्री उदय सामंत, खा. हेमंत गोडसे, आ. किशोर दराडे, आ. माणिकराव कोकाटे, आ. दिलीप बनकर, आ. डॉ.राहूल आहेर, आ. सिमा हिरे, आ. देवयानी फरांदे, आ.दिलीप बोरसे, आ. नितीन पवार, आ. मौलाना मुफ्ती मोहम्मद, आ. राहूल ढिकले, आ. हिरामण खोसकर, आ. सुहास कांदे, विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे, जिल्हाधिकारी गंगाथरन डी., जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल, नाशिक मनपाच्या प्रभारी आयुक्त भाग्यश्री बानाईत यांच्यासह जिल्ह्यातील लाभार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान या कार्यक्रमासाठी शिवसेनेचे सर्व पदाधिकारी, शिवसैनिक तसेच राष्ट्रवादी आणि भाजपचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'शासन आपल्या दारी' अभियानात नाशिक जिल्ह्यात १० लाखांपेक्षा अधिक नागरिकांना लाभ देण्यात आला आहे, असे नमूद करून मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, सर्वसामान्य नागरिकांना एकाच छताखाली योजनांचा लाभ देण्याचा ऐतिहासिक निर्णय शासनाने घेतला आहे. शासनाने एका वर्षाच्या कालावधीत सर्वसामान्यांच्या हिताचे अनेक निर्णय घेतले. सर्व निर्णय सर्वसामान्य जनता, शेतकरी, कष्टकरी, माता-भगिनी, विद्यार्थी तरूणांच्या हिताचे आहेत. ३५ सिंचन प्रकल्पांना शासनाने सुधारित प्रशासकीय मान्यता दिली. यामुळे लाखो हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. मुंबई मेट्रो, समृध्दी महामार्ग व जलयुक्त शिवार यासारख्या प्रकल्पांना चालना देण्याचे काम शासन करत आहे.

महिला सक्षमीकरणासाठी बचतगटांना अधिक भांडवल उपलब्ध करून देण्यासाठी शासन विविध लोकाभिमुख योजना राबवित आहे. एकाच वेळेस ७५ हजार पदांची भरती केली जाणार आहे. मुख्यमंत्री रोजगार कार्यक्रमाच्या माध्यमातून तरूणांना सक्षम करण्याचे काम शासन करत आहे. शासनाच्या विकासाच्या योजनांपासून कोणीही वंचित राहणार नाही, सर्वांना शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करण्यात यावेत, अशी अपेक्षाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी व्यक्त केली.



विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाची कास धरण्यासाठी टॅब, जिल्ह्यात प्रथमच तृतीय पंथीयांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी कौशल्य विकासाच्या माध्यमातून स्वयंरोजगार योजनेचा लाभ देण्यात आला आहे. तसेच बचतगटांच्या महिलांना उद्योगांसाठी अनुदान, बांधकाम कामगारांना सुरक्षा साहित्याचे किट, आदिवासी बचतगटांना विटभट्टीसाठी अनुदान, महिला सक्षमीकरण, शेतकरी लाभाच्या विविध योजना, होतकरू तरुणांना रोजगार, घरकुल आवास योजना अशा सर्वसमावेशक विकास योजनांचा लाभ काल नाशिक जिल्हावासियांना एकाच छताखाली मिळाला. दरम्यान महायुती सरकारने जोरदार शक्ती प्रदर्शन करत जिल्ह्यामध्ये आपली ताकद या निमित्ताने दाखवून दिल्याची चर्चा मोठ्या प्रमाणावर होऊ लागली आहे. यावेळी मुख्यमंत्री जनकल्याण कक्षाची माहिती डॉ.अमोल शिंदे यांनी दिली. २५ कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या जिल्हा क्रीडा संकुलाचे ई- भूमिपूजन यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच जिल्ह्यात अनुकंपा भरतीतून ४९० अनुकंप धारकांना नियुक्ती पत्र देण्यात आले आहेत. यावेळी मुख्यमंत्र्यांसोबत शासनाच्या विविध योजनांच्या १७ लाभार्थी व ६ सरपंचांना व्यासपीठावर बसण्याची संधी मिळाली. यामध्ये स्मिता डोंगरे, मुळी मौळे, बिजला नवले, अनिल बच्छाव, दुर्गा जाचक, साहेबराव चौधरी, अर्जून भोडवे, रूंजा टोंगरे, अनिल जाधव, दिलीप गांगुर्डे, गणेश पवार, राहूल निकम, राधाबाई दोंदे, भारती कडाळे, दिगंबर कड, शितल पाळदे, बापू काकुळते यांचा समावेश होता. स्मार्ट ग्राम कार्यकारी सरपंच गोरख जाधव, सचिन दरेकर, सुनिता पगारे, अश्विनी पवार, भाऊराव गवळी व शितल पवार या ६ सरपंचाच्या समावेश होता. या सर्व लाभार्थ्यांचा व सरपंचांना लाभाचे प्रमाणपत्र व धनादेश देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हाधिकारी गंगाथरन डी. यांनी केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे प्रभू श्रीरामाची मूर्ती देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी जिल्ह्याचे पालकमंत्री दादाजी भुसे यांनी जिल्ह्यात शासन आपल्या दारी कार्यक्रमाच्या माध्यमातून लाभार्थ्यांना दिलेल्या लाभाची माहिती दिली. कार्यक्रमाची सुरूवात राज्यगीताने करण्यात आली तर कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्पना साठे यांनी तर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी आभार मानले.

**ॲड.दिनेश वसंतराव गायकवाड**
**निशाणी नं.६**

**जाहिर नोटीस**

**साक्री येथिल मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्थर सो. यांचे न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज नं. ३२८/२०२२**

१) श्री. लोटन गिरधर सोनार उ.व.-५३ वर्षे, धंदा-शेती रा. १५२, गोकुळदाम सोसा. साईप्लेस, सानिया कांडे, दिंडोली, सुरत, गुजरात
२) श्रीमती सिंधूबाई श्रीराम सोनार उ.व.-४६ वर्षे, धंदा-शेती रा.अंजदे बु. ता.शिंदखेडा जि.धुळे
३) श्री. प्रविण श्रीराम सोनार उ.व.-५३ वर्षे, धंदामजूरी
४) श्री. शरदभाई श्रीरामभाई सोनार उ.व.-४५वर्षे, धंदा-मजूरी
३ व ४ रा. १७८, शिवाजी नगर, लिंबायत, सुरत
५) सौ. मिनाबाई मंगल सोनार उ.व.-४१ वर्षे, धंदा-गृहीणी रा.धोबीवाडा, यावल साकळी, ता.यावल जि.जळगांव
६) श्रीमती चंद्रकलाबाई गंगाराम सोनार उ.व.-७५वर्षे, धंदा-गृहीणी
७) श्री. संजय गंगाराम सोनार उ.व.-५३ वर्षे, धंदा-व्यवसाय
६ व ७ रा. अंजदे बु. ता.शिंदखेडा जि.धुळे
८) श्री.धनराज गंगाराम सोनार उ.व.-४६ वर्षे, धंदा-नोकरी रा.ऑक्सफोर्ड ब्लू सोसा. सांळुके विहार रोड, केदारी नगर, वाणवाडी, पुणे
९) श्री. विनोद गंगाराम सोनार उ.व.-४३वर्षे, धंदा-नोकरी रा. अंजदे बु. ता. शिंदखेडा जि. धुळे
१०) सौ. निर्मलाबाई विकास सोनार उ.व.-४९वर्षे, धंदा-गृहिणी रा.अंजदे बु. ता.शिंदखेडा जि.धुळे
११) श्री.भगवान झिपरु सोनार उ.व.-५९वर्षे, धंदा-शेती रा. २३२, अंबिका पार्क २, दिंडोली, सुरत उधना, गुजरात
१२) श्री. प्रकाश भावलाल सोनार उ.व.-५८वर्षे, धंदा-शेती रा. पिंपळे सिम, धरणगांव जि. जळगांव
१३) श्री. दिलीप भावलाल सोनार उ.व.-५४ वर्षे, धंदा-नोकरी रा.कळवंद रोड, प्लॉ.नं. ३, भंडारी कॉलनी, शिरपुर
१४) श्री. ज्ञानेश्वर भावलाल सोनार उ.व.-४९ वर्षे, धंदा-शेती रा. पिंपळे सिम, धरणगांव जि. जळगांव
१५) श्री.राजाराम भगवान सोनार उ.व.-५९वर्षे धंदा-शेती
१६) श्री. शिवाजी भगवान सोनार उ.व.-५५वर्षे धंदा-नोकरी
१५ व १६ रा. बहादूर रोड, नवनाथ मंदिर, अमळनेर जि. जळगांव
१७) सौ. नर्मदाबाई जनार्धन सोनार उ.व.-५४ वर्षे, धंदा-गृहीणी रा.विद्याविहार, मोहिदे, लोणखेडा, नंदुरबार .....**अर्जदार**

**विरुध्द**

१) कै. पोपट बुधू सोनार (मयत)
२) कै. गिरधर पोपट सोनार (मयत)
३) कै. श्रीराम पोपट सोनार (मयत)
४) कै. गंगाराम पोपट सोनार (मयत)
५) कै. लटकनबाई झिपरु सोनार (मयत)
६) कै. दगुबाई भावलाल सोनार (मयत)
७) कै. विमलबाई भगवान सोनार (मयत) .....**मयत**

**कुणीही नाही** ...**सामनेवाला**

ज्याअर्थी अर्जदाराने मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्थर सो. साक्री दि. / / २०२२ रोजी दि.कि. अर्ज. नं. / २०२२ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी वरील अर्जदाराने बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VII, १८२७ चे कलम प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठीचा अर्जदार हे वरील पत्त्यावर कायम स्वरुपी राहत असून मौजे टेंभे प्र भामरे ता. साक्री जि. धुळे शिवारातील गट नं. १६ त्यांसी क्षेत्र ६ हे १२ आर यांसी चतु:सीमा गाव नकाशा प्रमाणे या मिळकतीत अर्जदार यांचा वडिलोपार्जित अविभक्त ३ हे ०६ आर हिस्सा आहे. ही अर्जदार नं. १ ते १७ यांचे आजोबा कै. पोपट बुधू सोनार यांचा मृत्यू दि. १९.०७.१९७३ रोजी अजंदे बु. येथे झालेला असून, त्यांना एकुण तीन मुलं व तीन मुली असा परिवार होता. त्यांच्या मृत्यू पश्चात त्यांचे मुलं व मुली यांचाही मृत्यू झालेला आहे. तसेच कै. पोपट यांची पत्नी कै. पार्वताबाई पोपट सोनार यांचा मृत्यू दि. २२.०२.१९८५ रोजी झालेला आहे. मयत झाल्यांनतर त्यांना अर्जदारांव्यतिरिक्त कोणतेही वारस नाही त्यामुळे धुळे येथील मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौकशी दि.११/०८/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्थर सो कोर्ट नं. यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- साक्री
दिनांक :- २६ /०६/२०२३

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क.स्तर, साक्री** **दिवाणी न्यायालय क.स्तर, साक्री**

**ॲड.प्रतिभा आर. मोरे**
**निशाणी नं.६**

**जाहिर नोटीस**

**धुळे येथील मे. दिवाणी न्याया. सो. (व.स्तर) यांचे कोर्टात**

**दि.कि.अर्ज नं.८३३/२०२३**

१) श्री. प्रकाश त्यंबक चौधरी उव-४७, धंदा-शेती रा.शांताराम नगर नेर, ता जि धुळे
२) श्री. मोहन त्यंबक चौधरी उव-६०, धंदा-शेती रा क्रांतीचौक नेर, ता.जि.धुळे
३) श्री. शांताराम उत्तम चौधरी उ.व-५९ धंदा-हमाली रा.म्हसोबा मंदिरा जवळ सुभाष नगर जुने धुळे ता.जि.धुळे
४) श्री. शिवाजी उत्तम चौधरी उव-५३, धंदा :- हमाली रा.प्लॉट नं ३, बर्फ कारखान्याजवळ जुने धुळे ता.जि.धुळे
५) श्री. महादु उत्तम चौधरी उव-५१ धंदा:- हमाली रा.गल्ली नं १४, सुपडु आप्पा कॉलनी जुने धुळे, ता.जि.धुळे
६) श्री. रमेश उत्तम चौधरी उव-४७ धंदा : हमाली रा.म्हसोबा मंदिरा जवळ सुपडु आप्पा कॉलनी सुभाष नगर ता.जि.धुळे
७) श्री. निंबा लाला चौधरी उव-३९ धंदा :-व्यापार
८) श्री. राकेश लाला चौधरी उव-३९ धंदा :- व्यापार रा.वरखेडे ता.जि.धुळे
९) श्रीमती चंदनबाई लाला तेली/चौधरी उव-७० धंदा-घरकाम रा.वरखेडे ता.जि.धुळे
१०) श्री. उज्वला प्रविण चौधरी उव-४१ धंदा:-घरकाम रा.गल्ली नंबर ६ माधवपुरा तुकाराम विजय व्यायाम शाळेचे जवळ ता.जि. धुळे
११) श्री. संतोष बाबुलाल चौधरी उव-६५ धंदा :- व्यापार रा.कासारे ता.जि.धुळे
१२) श्री. भाईदास दगा चौधरी उव-६५ धंदा :- व्यापार रा.राम नगर पिपंळनेर ता.साक्री जि.धुळे .....**अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही**

कै.त्यंबक दाजी तेली (चौधरी) (मयत २८/१०/१९९५)
कै.उत्तम दाजी तेली (चौधरी) (मयत ३०/०१/२०२३)
कै.लाला दाजी तेली (चौधरी) (मयत ०९/०८/२०२०)
कै.रूपाबाई बाबुलाल चौधरी (मयत ३०/०६/२०००)
कै.मधुराबाई उर्फ नादरबाई दगा चौधरी (मयत २५/०१/२०१६)
...**सामनेवाला**

१) ज्याअर्थी सर्व सामनेवाला हे ३ भाउ व २ बिहीणी हया तेली चौधरी असुन, त्यांची वडीलोपार्जीत मिळकत मौजे शिरधाणे प्र नेर येथे गट नं ५६७ चे क्षेत्र ४ हेक्टर १९ आर आहे. सर्व सामनेवाले मयत असुन सामनेवाला क १ व २ यांच्या अनुक्रमे पत्न्या मयत आहेत. तसेच संबंधीत गटावरील मालक सदरी दर्शवलेले सर्व मयत झालेले आहेत. तसेच अनुक्रमांक ३ ची पत्नी व सर्वांचे मुल हे सर्व अर्जदार वर नमुद पत्यावर राहतात सर्व / दोनही अर्जदार हयांचे लाभात अर्ज हा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ च्या कलम VIII हेअरशिप सर्टीफिकेट मिळणे कामी अर्ज, हा त्यांचे वारसांनी सर्व अर्जदार हयांचे लाभात हेअरशिप सर्टीफिकेट मिळणे कामी अर्जदार सदरचा अर्ज हा दाखल करीत आहेत.

त्या अर्थी सदर प्रकरणात पुढिल तारीख ही २३/०८/ २०२३ अशी धुळे येथिल मे. ३ रे दिवाणी न्यायाधिश सो (व.स्तर) हयांचे कोर्टात कोर्ट नंबर यांचे समक्ष नेमण्यात आलेली आहे. सदर अर्जा बाबत कोणाचाही कोणताही हरकत असल्यास त्यांनी त्यांचे म्हणणे घेवुन वरील न्यायालयात सकाळी १०:३० वाजता त्यांचे म्हणणे मांडणे कामी हजर रहावे व म्हणणे मांडावे.

वरील दिवशी व वेळेस कोणीही हजर न झाल्यास, अर्जात कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येवुन, अर्जात अर्जदार हयांचे लाभात एकतर्फी निकाल हा करण्यात येइल.

येण प्रमाणे जाहिर नोटीस असे.

धुळे
ता. १४/७/२०२३

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.** **दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.**

## न्यूज कॉलम

### कर सहाय्यक परीक्षेत मयुर देवरे महाराष्ट्रात द्वितीय

**धुळे ।** एमपीएससीतर्फे झालेल्या कर सहाय्यक पदाच्या परीक्षेत शहरातील मयुर शरद देवरेने ओबीसी प्रवर्गातून राज्यात द्वितीय क्रमांक मिळवला. त्याची एकाच वेळी मंत्रालयात लिपीक व कर सहाय्यक या दोन्ही पदावर नियुक्ती झाली. त्याचे वडील शरद देवरे यांचे गॅरेज असून आई शिवणकाम करते. मयुरचा मोठा भाऊ प्रदीप महसूल सहायक म्हणून जिल्हाधिकारी कार्यालयात आहे. त्याचा श्री विश्वकर्मा संस्था, विश्वकर्मा फाऊंडेशन, प्रभृ विश्वकर्मीय समाज समन्वय समिती, श्री विश्वकर्मीय सुतार समाजातर्फे सत्कार झाला.

### लासलगाव जि प शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप

**लासलगाव ।** येथील मातोश्री हरकूबाई मोतीलालजी दायमा विविध सेवाभावी मंडळ,लासलगाव यांच्या वतीने जिल्हा परिषद मराठी व उर्दू शाळेत सर्व विद्यार्थ्यांना पाटी,वह्या,पेन,पट्टी इ.शालेय लेखन साहित्य वाटप करण्यात आले. सुवर्णा जगताप यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की,सदर ट्रस्टच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात हे कौतुकास्पद आहे.कोरोना काळात गरीब लोकांना शिधा वाटप करण्यात आलेला आहे.मागील वर्षीही ह्या दोन्ही शाळेत शालेय साहित्य वाटप करण्यात आल्याने जिल्हा परिषदेत ह्या संस्थेबाबत गौरवोदगार करण्यात आले असेही जगताप यांनी सूचित केले.

# जिल्हा बँक स्व-निधीतून पीकविमा हप्ता भरणार

### कर्जदार ३५ हजार शेतकऱ्यांना लाभ

**धुळे । प्रतिनिधी**

धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने स्व-निधीतून कर्जदार सरासरी ३५ हजार शेतकऱ्यांचा पीकविमा हप्ता भरण्याचा निर्णय घेतला आहे. बँकेच्या बैठकीत हा दिलासादायक निर्णय झाल्याची माहिती अध्यक्ष राजवर्धन कदमबांडे यांनी दिली. तसेच कर्जदारांनी १७ जुलैपर्यंत पीकविमा प्रस्तावासाठी आवश्यक ती कागदपत्रे संस्था सचिव किंवा बँक शाखा तपासणीसकडे जमा करावीत, असे आवाहन त्यांनी केले.

श्री. कदमबांडे म्हणाले, की राज्य शासनाने सर्वंकष पीकविमा योजना खरीप हंगाम २०२३ राबविण्याची घोषणा केली आहे. या योजनेमध्ये शेतकऱ्यांना केवळ एक रुपया भरून पीकविमा पोर्टलवर नोंदणी करायची आहे. यात निश्चित करण्यात आलेला पीकनिहाय हेक्टरी विमा हप्ता दर व शेतकऱ्यांनी भरायचा विमा हप्ता एक रुपया मात्र वजा जाता उर्वरित फरक हा सर्वसाधारण विमा हप्ता अनुदान समजून राज्य शासनामार्फत अदा करण्यात येईल. जिल्हा बँकेच्या सभागृहात अध्यक्ष कदमबांडे यांच्या अध्यक्षतेत संचालक मंडळाची बैठक झाली. तीत सर्वंकष विमा योजनेच्या अनुषंगाने कर्जदार शेतकऱ्यातर्फे प्रती अर्ज एक रुपया हा बँक स्वनिधीमधून भरणार आहे. तसेच शेतकरीहितासाठी प्रत्येक कर्जदार सभासदाचा विमा प्रस्ताव अर्ज केंद्र शासनाच्या पीएमएफबीवाय पोर्टलवर बँक स्वखर्चाने अपलोड करणार असल्याचा दिलासादायक निर्णय झाला. यानुसार धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील प्रत्येक शाखेकडून प्रत्येक कर्जदार शेतकऱ्याचा विमा प्रस्ताव अर्ज संस्थेच्या सचिवाकडून तयार करून पीएमएफबीवाय पोर्टलवर नोंदणीसाठी बँकेच्या मुख्य कार्यालयाकडे मागविण्यात आला आहे. बँकेच्या निर्णयानुसार खरीप हंगाम २०२३-२०२४ या कालावधीत पीककर्ज घेतलेल्या धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील सर्व प्राथमिक विविध कार्यकारी, आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थेतील सभासद, संस्थांचे पदाधिकारी, वैयक्तिक कर्जदार, बँकेच्या सर्व हितचिंतकांनी पीकविमा प्रस्ताव अर्ज तयार करण्यासाठी सातबाऱ्याची झेरॉक्स प्रत, स्वत:च्या अपडेट आधारकार्डची झेरॉक्स, जिल्हा बँकेतील सेव्हिंग पासबुकची झेरॉक्स प्रत, पीकपेरणी झाल्याबाबत पेरणी तारखेसह पीकपेरणीचे स्वयंघोषणापत्र आदी कागदपत्रे १७ जुलैपूर्वी संस्थेचे सचिव किंवा बँक शाखा तपासणीसाकडे तत्काळ जमा करावीत, असे आवाहन अध्यक्ष कदमबांडे, मुख्य कार्यकारी अधिकारी धीरज चौधरी आणि सर्व संचालक मंडळाने केले.



**असा दिला जाईल लाभ**

**जिल्हा बँक ३५ हजार कर्जदार सभासद शेतकऱ्यांचा पीकविमा हप्त्याचा प्रत्येकी रुपया भरणा करेल. पीएमएफबीवाय पोर्टलवर प्रत्येक प्रस्ताव अपलोड करण्याचा सर्व खर्च बँक करेल. राज्य शासनाकडून कापसासाठी ५ टक्के, तर इतर पिकांसाठी २ टक्के पीकविमा हप्ता राज्य सरकार अदा करणार असल्याची माहिती बँकेने दिली. बँक पीकविमा हप्ता स्वनिधीतून भरेल.**

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे नाशकात जल्लोषात स्वागत





### उपमुख्यमंत्री पवार यांच्या गाडीचे माजी खासदार समीर भुजबळ यांनी केले सारथ्य

**नाशिक । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे काल नाशिकरोड रेल्वे स्थानकात आगमन होताच पदाधिकारी कार्यकर्त्यांच्या वतीने ढोलताशा वाजवत, फटाक्यांची आतषबाजी व पुष्पवृष्टी करत नाशिक शहरात जल्लोषात स्वागत करण्यात आले.

यावेळी माजी खासदार समीर भुजबळ, माजी खासदार देविदास पिंगळे, आ. माणिकराव कोकाटे, आ. दिलीप बनकर, आ. नितीन पवार, आ. सरोज आहिरे, माजी आमदार जयवंतराव जाधव, अपूर्व हिरे, जिल्हाध्यक्ष ड.रवींद्र पगार, शहराध्यक्ष रंजन ठाकरे, नानासाहेब महाले, निवृत्ती अरिंगळे, मनोहर कोरडे, कैलास मुदलीयार, युवक शहराध्यक्ष अंबादास खैरे, समाधान जेजुरकर, महिला शहराध्यक्ष योगिता आहेर, विद्यार्थी अध्यक्ष गौरव गोवर्धने, मीनाक्षी काकळीज, सुरेखा निमसे, डॉ.कल्पना शिंदे, संजय खैरनार यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होते.

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे काल शासन आपल्या दारी कार्यक्रमासाठी नाशिक दौऱ्यावर आले. सकाळी ९ वाजेच्या वंदे भारत एक्सप्रेसने नाशिकरोड रेल्वे स्थानकात त्यांचे आगमन झाले. याप्रसंगी माजी खासदार समीर भुजबळ यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्त्यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन जल्लोषात स्वागत केले. त्यानंतर नाशिकरोड येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करत अभिवादन केले. त्यानंतर नाशिकरोड येथून मोटारसायकल रॅली काढत नाशिकरोड ते शासकीय विश्रामगृहापर्यंत त्यांचे शहरात ठिकठिकाणी जल्लोषात स्वागत करण्यात आले. याप्रसंगी माजी खासदार समीर भुजबळ यांनी त्यांच्या गाडीचे सारथ्य केले.

नाशिक शहरात त्यांचे नाशिकरोड, छत्रपती शिवाजी महाराज चौक, दत्त मंदिर, उपनगर, द्वारका, मुंबईनाका चौकासह ठिकठिकाणी फटाक्यांची आतषबाजी करत फुलांची उधळण करत जल्लोषात स्वागत करण्यात आले. जेसीबी मधून पुष्पवृष्टी करत क्रेनच्या सहायाने हार घालण्यात आला. यावेळी पदाधिकारी कार्यकर्त्यांची व नाशिककरांची अभूतपूर्व गर्दी बघावयास मिळाली.

# श्री स्वामी समर्थ माध्यमिक विद्यालयात सायकल वाटप



**शिंदखेडा ।** शिंदखेडा येथील श्री स्वामी समर्थ माध्यमिक विद्यालयात मानव विकास मिशन अंतर्गत मोफत सायकल वाटप कार्यक्रम मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यालयातील इयत्ता ८ वी च्या वर्गात शिकणाऱ्या टेंबलाय गावाहुन पायी येणाऱ्या ९ विदयार्थीनीना या योजनेअंतर्गत शासन आपल्या दारी कार्यक्रमानिमित्त मानव विकास मिशन अंतर्गत मोफत सायकली वाटप करण्यात आल्या.

यावेळी मुख्याध्यापक एम.डी. पाटील, मूकबधिर विद्यालयाचे मुख्याध्यापक सुरेश पाटील सह पालक उपस्थित होते. याप्रसंगी मुख्याध्यापक एम.डी.पाटील यांनी सांगितले की,मानव विकास मिशन योजनेअंतर्गत महत्त्व व फायदे याविषयी मनोगत व्यक्त केले. उपस्थिती वाढावी शिक्षणात खंड पडू नये यासाठीच आपणास या योजनेचा लाभ मुलींना देण्यात येत आहे. असे प्रतिपादन केले. सर्व मुलींना संस्थेचे अध्यक्ष डॉ. आर.आर.पाटील यांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व्ही. एस. सोनवणे यांनी केले तर आभार प्रदर्शन एस.एल.पाटील यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी वर्गशिक्षक विजय जाधव यांनी परिश्रम घेतले.

# मनपाकडून पर्यावरणपूरक गणेश मूर्ती बनविण्याची कार्यशाळा संपन्न

### बाप्पाला साकारतांना विद्यार्थी आनंदीत

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक महापालिकेचा पर्यावरण विभाग आणि संगमनेर येथील लिबर्टी अर्थवेअर आर्ट यांच्या संयुक्त विद्यमाने अंबड गाव येथील मनपा शाळा क्रमांक ७८ मध्ये शाडू मातीचे गणपती बनविण्याची कार्यशाळा संपन्न झाली. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला.

याप्रसंगी पर्यावरण विभागाचे उपायुक्त डॉ. विजयकुमार मुंडे, शिक्षण विभाग प्रशासन अधिकारी पाटील बी. टी. पाटील, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उप प्रादेशिक अधिकारी अमर दुर्गुळे, लिबर्टी अर्थ वेअर आर्ट संस्थेच्या संचालिका वंदना जोरवेकर, हेमंत जोरवेकर आदी उपस्थित होते. लिबर्टी अर्थ व्हेअर आर्ट्स यांच्या सहकार्याने शाडू मातीचा गणपती बनवण्याची स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी उस्फुर्तपणे सहभाग घेत सुंदर मूर्ती बनविल्या. यंदाच्या गणेशोत्सवात पीओपीच्या मुर्ती न वापरता फक्त शाडू मातीच्या मुर्ती बनवाव्यात व वापराव्यात असे आवाहन उपस्थित मान्यवरांनी केले.



डॉ. विजयकुमार मुंडे त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना पर्यावरणाचे महत्व आणि संवर्धनाविषयी माहिती दिली. अमर दुर्गुळे यांनी विद्यार्थ्यांना शाडू मातीचे महत्त्व, नदीचे प्रदुषण या मुद्यांवर कशा पद्धतीने जनजागृती करावी व त्याचे फायदे काय आहेत? याची माहिती दिली. कार्यशाळेच्या प्रशिक्षक वंदना जोरवेकर यांनी विद्यार्थ्यांना मूर्ती बनविण्याबाबत मार्गदर्शन केले. अतुल वाकचौरे, नितीन सातव, बाळासाहेब शेवाळे, मुख्याध्यापक अरुण दातीर यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यशाळेला सहकार्य केले.

# शेतकरी संघर्ष समिती व पीक संरक्षण सोसायटीचे नगरपंचायत प्रशासनास निवेदन

**शिंदखेडा । प्रतिनिधी**

शिंदखेडा शहरात एकूण ५६ वृक्षांची तोड होणार असल्याची निविदा ८ जुलै रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यात दहा झाडे शिंदखेडा शहरातील विश्रामगृहातील नवीन इमारत बांधण्यासाठी व शहरातील बस स्थानकात नवीन चार्जिंग स्टेशन उभारणी करिता एकूण ५६ झाडे तोडण्याची निविदा प्रसिद्ध करण्यात आली होते. त्या निविदेविरुद्ध शेतकरी संघर्ष समिती व पिक संरक्षण सोसायटी यांचे संयुक्त विद्यमाने नगर पंचायत प्रशासनास निवेदन देण्यात आले.

निविदा मागे न घेतल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा चेअरमन, व्हा चेअरमन यांच्या वतीने देण्यात आला आहे. यामध्ये या वृक्षांची कत्तल आम्ही कोणत्याही परिस्थितीत होऊ देणार नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. झाडांची कत्तल न होता. सदर कामासाठी नवीन जागा शोधून त्यात पुढील बांधकाम व चार्जिंग स्टेशन उभारण्यात यावे असे सांगण्यात आले आहे. एकेका झाडाचे अनन्यसाधारण महत्त्व असताना देखील एकूण ५६ वृक्षांची तोड करण्यासाठी निविदा काढलीच कशी असा प्रश्नही उपस्थित करण्यात आला. सदर वृक्षांची कत्तल न रोखल्यास निविदा मागे न घेतल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा चेअरमन, व्हा चेअरमन यांच्या वतीने देण्यात आला आहे. या निर्णयामुळे पर्यावरणप्रेमींमधून संताप व्यक्त होत आहे. प्रशासनाने निर्णय मागे घेण्याची देखील मागणी होत आहे.

# शिंदखेडा ते दोंडाईचा रस्त्यावरील फरशी पुलाची रुंदी वाढवण्याची मागणी

### रास्ता रोको आंदोलना नंतर गतिरोधकाचे काम सुरु

**चिमठाणे । प्रतिनिधी**

शिंदखेडा येथे १ जुलै रोजी भीषण अपघात झाला होता. त्यासाठी ३ जुलै रोजी साईलिला नगर बहुउद्देशिय मंडळाच्या वतीने रास्ता रोको करत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्यात आले होते.

यानंतर दोंडाईचा रस्त्यावर ठिकठिकाणी गतिरोधक टाकण्याचे काम चालू झाले आहे. गतीरोधक टाकण्याचे काम चालू असताना पावसामुळे व्यत्यय आल्याने पुढील काम लवकर चालू करू असे संबंधीत अधिकाऱ्याने सांगितले. शिंदखेडा ते दोंडाईचा रस्त्यावरील पहिल्या फरशी पुलाची रुंदी वाढवणे आवश्यक असल्यामुळे लवकरात लवकर रुंदीकरण व्हावे या मागणीसाठी आंदोलन केले गेले. सार्वजनिक बांधकाम विभागास सामाजिक संघटनांद्वारे निवेदने देण्यात आले परंतु अरुंद पुला संबंधित तिढा कायम



असल्यामुळे जनता प्रतीक्षेत आहे. या विषयावर सार्वजनिक बांधकाम उपविभाग शिंदखेडा यांनी,या रस्त्यावरील अरुंद पुलाची रुंदी वाढवणे बाबत जुलै २०२३ च्या पुरवणी अर्थसंकल्पात काम समावेश करण्यासाठी सादर करण्यात येईल तसेच फरशी पुलाची रुंदी वाढवणे व रस्ता दुभाजकाची लांबी वाढवणे बाबत मंजुरीनंतर कामास सुरुवात करण्यात येईल अशी माहिती दिली. आज पर्यन्त अरुंद पुलाजवळ कित्येक दुर्घटना झालेत व त्यात निष्पाप लोकांना जीव गमावा लागला आहे. या कारणास्तव सार्वजनिक बांधकाम उपविभाग शिंदखेडा यांनी लवकरात लवकर पाठपुरावा करून सदर पुलाची रुंदी वाढवणे संदर्भात मंजुरी मिळवावी व कामास सुरुवात करावी अशी अपेक्षा जनतेतून केली जात आहे.


# अनोखी व नाविण्यपूर्ण ई - निवडणूक संपन्न

### हस्ती स्कूलच्या विद्यार्थ्यांचा उपक्रम

**दोंडाईचा । प्रतिनिधी**

हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलीत हस्ती पब्लिक स्कूल अँड ज्यु. कॉलेज व हस्ती वर्ल्ड स्कूल आणि हस्ती गुरूकुल दाउळ शिवार कँपस् दोंडाईचा येथे नुकतीच विद्यार्थी हाउस प्रतिनिधींसाठी लोकशाही निवडणूक पद्धतीने अनोखी व नाविन्यपूर्ण ई - मतदान प्रक्रिया संपन्न झाली.

यात ब्ल्यू - गांधी हाउस, यलो - टिळक हाउस, रेड - टागोर हाउस व ग्रीन - नेहरू हाउस अशा चारही हाउसेससाठी हस्ती पब्लिक स्कूलचे मुले - प्रिफेक्ट व व्हाइस प्रिफेक्ट पदाकरिता एकुण ३४ उमेदवारांना ५८६ मतदारांनी; तर मुली प्रिफेक्ट व व्हा. प्रिफेक्ट पदाकरिता २६ उमेदवारांना ४८८ मतदारांनी; आणि हस्ती वर्ल्ड स्कूलचे मुले प्रिफेक्ट व व्हा. प्रिफेक्ट पदाचे २२ उमेदवारांना १३३ मतदारांनी; व मुली प्रिफेक्ट व व्हा. प्रिफेक्ट पदाचे २० उमेदवारांना ९१ मतदारांनी; तसेच हस्ती गुरूकुलच्या मुले प्रिफेक्ट पदाचे ११ उमेदवारांना ६२ मतदारांनी: व मुली प्रिफेक्ट पदाचे १० उमेदवारांना ३० मतदारांनी आपल्या आवडत्या उमेदवारांना संगणकावर ' ई ' मतदान केले. अशा प्रकारे लोकशाही पद्धतीने निवडणूक मतदान प्रक्रिया राबविली गेली.यासाठी चारही हाउसेसच्या इच्छुक विद्यार्थी व विद्यार्थिनी उमेदवारांनी हाउस निहाय आपली उमेदवारी निवडणूक चिन्हासह जाहीर करून निवडणूक नियमाप्रमाणे विद्यार्थ्यांमध्ये आपला निवडणूक प्रचारही केला.






**हस्ती पब्लिक स्कूल अँड ज्यु. कॉलेज** - रेड हाउस प्रिफेक्ट - मोहित देवरे, व्हा. प्रिफेक्ट हिमांशु चव्हाण, मुली प्रिफेक्ट जागृती माळी, व्हा. प्रिफेक्ट प्राची खंडेराव, ग्रीन हाउस मुले प्रिफेक्ट - दिक्षांत पाटिल, व्हा. प्रिफेक्ट ललीत पाटिल, मुली प्रिफेक्ट कशिष महाले, व्हा. प्रिफेक्ट गार्गी बेहरे, यलो हाउस मुले प्रिफेक्ट - वेदांत पाटिल, व्हा. प्रिफेक्ट अंकित राउत, मुली प्रिफेक्ट विशाखा पावरा, व्हा. प्रिफेक्ट वैशाली पावरा, ब्ल्यु हाउस मुले प्रिफेक्ट तनिष भावसार, व्हा. प्रिफेक्ट - अविनाश चौरे, मुली प्रिफेक्ट मनस्वी बहिरम, व्हा. प्रिफेक्ट तमन्ना वळवी.

**हस्ती वर्ल्ड स्कूल** - रेड हाउस - मुले प्रिफेक्ट - कल्पेश खांडेकर, व्हा. प्रिफेक्ट - सोहम पाटिल, मुली - प्रिफेक्ट आयुषी जैन, व्हा. प्रिफेक्ट आकांक्षा अग्रवाल, ग्रीन हाउस - प्रिफेक्ट मुले - कार्तिक पाटिल, व्हा. प्रिफेक्ट हर्ष महाजन, मुली प्रिफेक्ट - आदिती गिरासे, व्हा. प्रिफेक्ट दिग्विजयी गिरासे, यलो हाउस मुले - प्रिफेक्ट दिपेश बोरसे, व्हा. प्रिफेक्ट ओजस पाटिल, मुली प्रिफेक्ट - अंकिता गिरासे, व्हा. प्रिफेक्ट यशश्री रगडे, ब्ल्यु हाउस मुले प्रिफेक्ट - भावेश पाटिल, व्हा. प्रिफेक्ट सम्यक पाटिल, मुली प्रिफेक्ट - पृथा चव्हाण, व्हा. प्रिफेक्ट सैषा जैन.

**हस्ती गुरूकुल** - मुले प्रिफेक्ट - रेड हाउस - नक्ष बोरसे, ग्रीन हाउस नयन पाटिल, यलो हाउस शैलेष धनगर, ब्ल्यु हाउस अनिष पाटिल. मुली प्रिफेक्ट रेड हाउस - सायली पाटिल, ग्रीन हाउस - आरूषी पवार, यलो हाउस - भाविका सोनवणे, ब्ल्यु हाउस - युक्ता सनेर. अशा स्वरूपाची विद्यार्थी प्रतिनिधींची निवड करण्यासाठी लोकशाही मतदान पद्धती राबविणारी हस्ती स्कूल जिल्ह्यात एकमेव शाळा असावी.

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्था
Admission Open
विद्याधन महाविद्यालय, वलवाडी, धुळे
NAAC Accredited 'B' Grade – वडेल रोड, एमएसईबी जवळ, वलवाडी, धुळे
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ जळगाव, कोड नं. 200111
B.Sc. | B.C.A | M.M.S./M.C.M.
डिप्लोमा उत्तीर्ण झालेल्यांना S.Y.B.Sc. ला प्रवेश SC/ST साठी मोफत
संपर्क: प्रा.ललिता निकम: 8862044791, प्रा.जागृती पाटील: 7887934365
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक कोड नं. 5299A
B.A., B.C.A, B.Sc., M.A., M.C.A., M.B.A.
सर्व अभ्यासक्रमांना सत्यप्रतीवर (झेरॉक्स) प्रवेश मिळेल.
प्रा.हर्षल पाटील: 9421283577, श्री.नितेश पाटील: 9922116438,
प्रा.भूषण पाटील: 7709100798
शासन मान्यताप्राप्त एम.एस.बी.टी.ई. मुंबई संलग्नीत कोड नं.2053
P.G.D.M.L.T. Advanced Diploma in Medical Laboratory Technology
पात्रता – बीएस्सी केमेस्ट्री, बॉटनी, झुऑलॉजी, मायक्रो बायोलॉजी/ बी.फार्म/बी.ए.एम.एस./बी.डी.एस./एम.बी.बी.एस.
संपर्क : प्राचार्य डॉ.के.बी.पाटील – 9422288518,
सौ.शारदा पाटील – 9423496344
प्राचार्य डॉ.आर.बी.पवार: 9420375735,
प्रा.डॉ.योगेश बोरसे: 9423378936, श्री. हर्षल पाटील: 9421283577

CMYK

दैनिक
लक्ष महाराष्ट्र





# निकुंभे शाळेत दाखवले चांद्रयान ३ चे प्रक्षेपण













धुळे। जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा इंजि. अश्विनीताई पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती बुवणेश्वरी एस. यांच्यासह पदाधिकारी अधिकाऱ्यांनी शुक्रवारी निकुंभे (तालुका धुळे) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत विद्यार्थ्यांसोबत चांद्रयान ३ चे थेट प्रक्षेपण अनुभवले, जिल्हा परिषद अध्यक्षा विद्यार्थ्यांसोबत गप्पांमध्ये रंगल्याचे चित्र यावेळेस पहावयास मिळाले. जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी देखील उच्च प्रतीचे ध्येय बाळगून विज्ञानाची कास धरावी असा मोलाचा सल्लाही सौ. पाटील यांनी यावेळी विद्यार्थ्यांना दिला. भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या चांद्रयान तीन या मोहिमेचे थेट प्रक्षेपण आंध्र प्रदेशातील श्रीहरीकोटा येथून शनिवारी दुपारी २.३५ वाजता करण्यात आले. हे थेट प्रक्षेपण जिल्हा परिषदेतील शाळांच्या विद्यार्थ्यांसमवेत अनुभवण्याची संकल्पना धुळे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष इंजिनिअर अश्विनीताई पाटील यांनी मांडली. त्यानुसार निकुंभे( तालुका धुळे) येथील जिल्हा परिषदेच्या डिजिटल शाळेत अध्यक्षा सौ. पाटील पोहोचल्या. मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती बुवनेश्वरी एस , माजी जिल्हा परिषद कृषी सभापती प्राध्यापक श्री अरविंद जाधव, सहाय्यक गटविकास अधिकारी श्री रावसाहेब वाघ, गटशिक्षणाधिकारी श्रीमती सुरेखा देवरे आदी यावेळी उपस्थित होते. अध्यक्ष सौ. पाटील यांच्यासह उपस्थित मान्यवर यांनी विद्यार्थ्यांसमवेत खाली बसून चांद्रयान ३चे थेट प्रक्षेपणअनुभवले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसमवेत जिल्हा परिषद अध्यक्ष प्रक्षेपण पाहत असल्याचे चित्र यावेळी पहावयास मिळाले. यावेळी अध्यक्ष सौ. पाटील म्हणाल्या की आज चांद्रयान तीन चे यशस्वी उड्डाण आपण पाहत आहोत. हे उड्डाण भरताना काही सेकंद लागले. मात्र त्यामागे शास्त्रज्ञांची अनेक वर्षांची तपश्चर्या आहे. कुठलेही यश मिळविण्यामागे प्रचंड मेहनत लागत असते. अभ्यास आणि मेहनतीच्या जोरावर ज्ञान विज्ञानाची कास धरून आपण देखील यशाची उड्डाणे पादाक्रांत करू शकतो असा विश्वास त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. याप्रसंगी सरपंच मयुरी पाटील, उपसरपंच गोरख पाटील, शालेय समितीचे चेअरमन दिनेश वाघ,विस्ताराधिकारी मनीषा वानखेडे, केंद्रप्रमुख बैसाने, मुख्याध्यापक अशोक पाटील, अभिलाल पाटील, डॉक्टर सुरजसिंग गिरासे, दादाभाई पाटील, जयसिंग गिरासे, राजेंद्र पाटील, उत्तम वाघ, भगवान मोरे, राजेंद्र माळी, यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते

संकलन : दिपक वाघ

CMYK

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र

रविवार, दि. १६ जुलै २०२३





# उपमुख्यमंत्री पवार यांच्या स्वागताला नाशिककरांची अभूतपूर्व गर्दी























नाशिक । उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे काल नाशिकरोड रेल्वे स्थानकात आगमन होताच पदाधिकारी कार्यकर्त्यांच्या वतीने ढोलताशा वाजवत, फटाक्यांची आतषबाजी व पुष्पवृष्टी करत नाशिक शहरात जल्लोषात स्वागत करण्यात आले. यावेळी माजी खासदार समीर भुजबळ, माजी खासदार देविदास पिंगळे, आ. माणिकराव कोकाटे, आ. दिलीप बनकर, आ. नितीन पवार, आ. सरोज आहिरे, माजी आमदार जयवंतराव जाधव, अपूर्व हिरे, जिल्हाध्यक्ष ड.रवींद्र पगार, शहराध्यक्ष रंजन ठाकरे, नानासाहेब महाले, निवृत्ती अरिंगळे, मनोहर कोरडे, कैलास मुदलीयार, युवक शहराध्यक्ष अंबादास खैरे, समाधान जेजुरकर, महिला शहराध्यक्ष योगिता आहेर, विद्यार्थी अध्यक्ष गौरव गोवर्धने, मीनाक्षी काकळीज, सुरेखा निमसे, डॉ.कल्पना शिंदे, संजय खैरनार यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होते. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे काल शासन आपल्या दारी कार्यक्रमासाठी नाशिक दौऱ्यावर आले. सकाळी ९ वाजेच्या वंदे भारत एक्सप्रेसने नाशिकरोड रेल्वे स्थानकात त्यांचे आगमन झाले. याप्रसंगी माजी खासदार समीर भुजबळ यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्त्यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन जल्लोषात स्वागत केले. त्यानंतर नाशिकरोड येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करत अभिवादन केले. त्यानंतर नाशिकरोड येथून मोटारसायकल रॅली काढत नाशिकरोड ते शासकीय विश्रामगृहापर्यंत त्यांचे शहरात ठिकठिकाणी जल्लोषात स्वागत करण्यात आले.यावेळी पदाधिकारी कार्यकर्त्यांची व नाशिककरांची अभूतपूर्व गर्दी बघावयास मिळाली.